**JAYDEEP B. KULKARNI**
B.E. (Civil), MIE, FIV
Chartered Engineer & Approved Valuer
Office : Shop No. 1, Runanubandh Renuka, Prof. Colony Chowk, Savedi, Ahmednagar - 414003. | Mo. : 9822049099
Resi. : "Shubham", Suyog Grih Mandal, Neal Prof. Colony, Savedi, Ahmednagar - 414 003
Tel. : (0241) 2422459

RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR

अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा नको? आता चष्मा घालवा कायमचा
डॉ. कांकरियांचे
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया
✻ शनिवार सकाळी १० ते १ ✻ नांवनोंदणी आवश्यक
✻ कॉन्ट्युरा व्हिजन ✻ मोतिबिंदू ✻ काचबिंदू ✻ नेत्ररोपण
साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
✻ एशियन आय हॉस्पीटल, पुणे ✻ साई दृष्टी हॉस्पिटल, मुंबई
आंतरराष्ट्रीय कीर्तिच्या नेत्रतज्ञांची टीम
लेसर नेत्रशस्त्रक्रियेचा जागतिक विक्रम
आंतरराष्ट्रीय कीर्तिचे भारतातील ४० वर्ष अनुभवी केंद्र
वर्धमान, माणिक चौक, अहमदनगर ४१४००१
Email : saisuryaa85@yahoo.com
www.saisuryasupervision.com
Help line 9112288611 Appointment 8888982222

■ Volume - 72 ■ Issue- 196 ■ Marathi Daily ■ Thursday 11/4/2024 ■ Pages - 6 ■ Price- Rs. 3

अग्रलेख: आणखी एक धोक्याचा इशारा पान २




एमबीएच्या विद्यार्थ्यांची अदानी वीज निर्मिती केंद्राला भेट पान ५



आनंदऋषीजी नेत्रालय विभागात व्हिजीओ क्राफ्ट दालनाचा शुभारंभ पान ६

## उठाठेव

– विवेक मेहेत्रे



साहेब.... बाहेर या! ते सी.बी.आय. मधून आले आहेत हे खरं.... पण 'सेंट्रल बँक ऑफ इंडियात' काम करणारे ते तुमचे, जुने शाळेतले मित्र आहेत म्हणे!!

### महायुतीच्या ९ तर महाविकास आघाडीच्या ५ जागांचा समावेश

# १४ जागांवरचे उमेदवार अजून गुलदस्त्यात!

**समाचार/नगर-दि.११**

राज्यातील लोकसभेच्या निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याचा प्रचार जरी सुरू झाला असला, तरी दोन्ही महायुती आणि महाविकास आघाडीच्या काही जागांवरचा पेच कायम आहे. महायुतीकडून अद्याप नऊ जागांवर उमेदवार देण्यात आलेला नाही, तर महाविकास आघाडीकडून पाच जागांवरील उमेदवाराचे नाव गुलदस्त्यात ठेवण्यात आले आहे. त्यामुळे त्या ठिकाणच्या तिन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठा संभ्रम असल्याचे दिसत आहे.महायुतीच्या जाहीर न झालेल्या जागा मुंबई उत्तर-मध्य,मुंबई उत्तर-पश्चिम,ठाणे नाशिक, पालघर, छत्रपती संभाजीनगर, सातारा, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, दक्षिण मुंबई.मविआच्या जाहीर न झालेल्या जागा-धुळे, जालना, उत्तर मुंबई,मुंबई उत्तर मध्य,माढा.

जागावाटपामध्ये सुरुवातीला आघाडी घेतलेल्या महायुतीमध्ये नंतर मात्र चर्चेच्या फेऱ्या वाढत



गेल्या आणि अद्यापही नऊ जागांवरील उमेदवार अंतिम झालेले नाहीत. त्यामध्ये ठाणे, नाशिक, रत्नागिरी-सिंधुदुर्ग या मतदारसंघावर भाजप आणि शिवसेना या दोन्ही पक्षांनी दावा केला आहे. तर छत्रपती संभाजीनगरमधील उमेदवारही अद्याप ठरत नसल्याचे दिसते. या आधी अमित शहांच्या औरंगाबाद दौऱ्यात त्यांनी या जागेवर भाजपला साथ द्या, असे आवाहन केले होते. त्यामुळेच या जागेवर भाजपने दावा केल्याचेही सांगितले जाते. पालघरच्या बाबतीतही तेच घडत असल्याचे दिसते. पालघरमध्येही शिवसेना आणि भाजपमध्ये उमेदवारीवरून काहीशी चढाओढ आहे. मुंबई उत्तर मध्य आणि मुंबई उत्तर पश्चिम या मतदारसंघातील उमेदवार अद्याप घोषित केले नाहीत. साताऱ्यामध्ये भाजपने उमेदवार जरी निश्चित केला नसला तरी त्या ठिकाणी उदयनराजे हेच उमेदवार असतील असे सांगितले जाते.महाविकास आघाडीमध्ये उत्तर मुंबईची जागा ही काँग्रेसच्या वाट्याला गेली आहे. पण त्यांच्याकडे उमेदवार नसल्याचे चित्र आहे. त्या ठिकाणी शिवसेना ठाकरे गटाचे विनोद घोसाळकरांनी तयारी सुरू केली आहे. तसेच माढ्याचा तिढा अद्याप सुटला नाही. धैर्यशील मोहिते पाटील हे शरद पवार गटात प्रवेश करणार असून त्यांना उमेदवारी देण्यात येणार आहे. तर दुसरीकडे धुळे आणि जालन्याची तसचे मुंबई उत्तर मध्यची उमेदवारी अद्याप जाहीर करण्यात आली नाही.

## दिलीप वळसेंचे निकटवर्तीय शरद पवारांच्या गळाला

**पुणे, दि. ११–** अजित पवार यांनी वेगळा निर्णय घेतल्यानंतर शरद पवार यांची साथ सोडणाऱ्या नेत्यांपैकी सर्वात धक्कादायक नाव हे दिलीप वळसे पाटील यांचे मानले जात होते.



वळसे पाटील यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात ही शरद पवार यांच्यासोबतच केली होती. वळसे पाटील हे शरद पवार यांचे अत्यंत विश्वासू सहकारी मानले जायचे. मात्र, अजित पवार यांनी वेगळी भूमिका घेतल्यानंतर दिलीप वळसे पाटील यांनी शरद पवार यांची साथ सोडून अजित पवार यांना समर्थन दिले. त्यानंतर आता दिलीप वळसे पाटील यांचे गुरु असणारे शरद पवार यांनी दिलीप वळसे पाटील यांच्या होम पिचवरच डाव टाकत त्यांना मोठा धक्का दिला आहे.

आंबेगाव तालुक्यात दिलीप वळसे पाटील यांचे निकटवर्ती असणारे शेखर पाचुंदकर यांच्यावर शरद पवार यांनी मोठी जबाबदारी सोपवली आहे. शेखर पाचुंदकर यांच्यावर आंबेगाव शिरूर विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष पदाची जबाबदारी शरद पवार यांनी **(पान ३ वर)**

## निवडक

### केजरीवाल सरकारमधील मंत्र्याचा राजीनामा

**नवी दिल्ली, दि. ११–** केजरीवाल सरकारमधील समाजकल्याण मंत्री राजकुमार आनंद यांनी बुधवारी (१० एप्रिल) आम आदमी पक्षाच्या सदस्यपदाचा आणि मंत्रिपदाचा राजीनामा दिला. अरविंद केजरीवाल तुरुंगात गेल्यापासून पक्षांतर्गत हालचाली वाढल्या आहेत. दिवसागणिक आपच्या अडचणी वाढताना दिसत आहेत. राजकुमार आनंद यांनी राजीनामा दिल्यामुळे पक्षाला पुन्हा धक्का बसला आहे. विशेष म्हणजे इंडिया अगेन्स्ट करप्शनफ चळवळीच्या दिवसांपासून ते मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्याबरोबर होते. त्यांच्या राजीनाम्याने पक्षातील त्यांचे सहकारीदेखील आश्चर्य व्यक्त करीत आहेत. आनंद यांनी दलित नेत्यांना पक्षात आदर नसल्याचा आरोपही केला. मी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वांवर चालणारा व्यक्ती आहे आणि त्यांच्यामुळेच मी मंत्री झालो. पक्षात मला दलितांसाठी काम करण्याची संधी मिळत नसेल, तर पक्षात राहण्यात अर्थ नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### हार्दिक पंड्याला सावत्र भावानेच लावला ४ कोटींना चुना



**नवी दिल्ली, दि. ११–** क्रिकेटपटू हार्दिक पंड्याच्या सावत्र भावाला बुधवारी कृणाल आणि हार्दिक या दोन्ही भावांची फसवणूक केल्याप्रकरणी अटक करण्यात आली. वैभव पंड्या त्याच्याच सावत्र भावांची ४.३ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी दोषी आढळला आहे. वैभवसोबत हार्दिक पंड्या आणि कृणाल पंड्या यांची एका व्यवसायात भागीदारी होती. ज्यामध्ये हार्दिक आणि कृणाल यांचा प्रत्येकी ४० टक्के तर वैभवचा २० टक्के वाटा होता. वैभववर फसवणूक आणि बनावट कागदपत्रे तयार केल्याचा आरोप आहे. २०२१ मध्ये तिघांनी मिळून पॉलिमर व्यवसाय सुरू केला. कंपनीचा नफा आपल्या भावांना देण्याऐवजी वैभवने वेगळी कंपनी स्थापन करून ती त्याच्याकडे हस्तांतरित करून व्यवसायाच्या भागीदारी कराराचे उल्लंघन केले.

### नियोजनाचे मनपा प्रशासनासमोर आव्हान

# शहरात पाणी टंचाईचे संकट उद्भवणार?




**समाचार/नगर-दि.११**

जलसंपदा विभागाने मुळा धरणातून पाणी उपसा करणाऱ्या पाणी योजनांच्या वापरात वीस टक्के पाणी कपात करण्याचा निर्णय केला आहे. त्यामुळे नगर शहराच्याही पाण्यात वीस टक्के कपात होणार आहे. यामुळे शहरात पाणी टंचाईचे संकट उद्भवण्याची शक्यता असून, या काळात पाण्याचे योग्य नियोजन करण्याचे आव्हान मनपा प्रशासनासमोर असणार आहे.

जिल्ह्यातील भंडारधरा, निळवंडे, मुळा धरणातून, जायकवाडी धरणात पाणी सोडले आहे. त्यामुळे या तिन्ही धरणांमधील पाणीसाठा कमी झालेला आहे. या उपलब्ध पाणी साठ्यावर पुढील चार महिने काढावी लागणार आहे. त्यामुळे जलसंपदा विभागाने पिण्याचे पाणी राखीव ठेवताना बिगर सिंचनास जलसंपदा विभागाने वीस टक्के पाणी कपात लागू केले आहे. तिचा कालावधी २१ जुलैपर्यंत आहे. वार्षिक साठ्यात कपात करुन उर्वरित पाणी वापरण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांवर टाकण्यात आली आहे. नगर शहराला मुळा धरणातून वार्षिक साठा ३९.०७ दलघमी मंजूर आहे. त्यातून वीस टक्के पाणी कपात करण्यात आल्याने ३१.२६ दलघमी पाणी वापरता येणार आहे. आतापर्यंत मनपाने १७.८ दलघमी पाणी वापरले आहे. आता पुढील चार महिन्यांसाठी अवघे १३.४६ दलघमी पाणी शिल्लक आहे. त्यामुळे या पाण्याचे नियोजन मनपा प्रशासनाला करावे लागणार आहे. हे नियोजन करताना मनपा प्रशासनाला तारेवरची कसरत करावी लागणार आहे. दरम्यान मनपा प्रशासनाने पाण्याचे योग्य नियोजन न केल्यास शहरातील नागरिकांवर पाण्यासाठी वणवण फिरण्याची वेळ येण्याची शक्यता आहे.



नगर शहरात आज रमजान ईद उत्साहात साजरी करण्यात आली. रमजान ईदनिमित्त कोठला येथील ईदगाह मैदानावर मुस्लिम समाजबांधवांनी सामुहीक नमाज पठण केले. **(छाया– उदय जोशी)**

### व्यापारी असोसिएशनची नगरमध्ये बैठक

# विकास आराखड्यातून बाजारपेठेला चालना मिळेल- पालकमंत्री विखे



**समाचार/नगर-दि.११**

विकासाचा सांख्यिकी आरखडा तयार करणारा नगर जिल्हा हा राज्यातील पहिला जिल्हा आहे. औद्योगिक आणि तीर्थ क्षेत्र पर्यटनातून होणारी गुंतवणूक व्यापारी पेठेवरही सकारात्मक परिणाम करणारी ठरेल असे प्रतिपादन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

आडते बाजार मर्चन्टस असोसिएशन व कांदा-भाजीपाला फळे, फुले अडते असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात पालकमंत्री विखे बोलत होते. यावेळी आ.संग्राम जगताप, अध्यक्ष अशोक गांधी, उपाध्यक्ष गोपाल मणियार, सेक्रेटरी संतोष बोरा, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर, ज्येष्ठ नेते वसंत लोढा, ॲड. धनंजय जाधव, निखिल वारे,राजेंद्र बोरा, अशोक लाटे उपस्थित होते.

विखे म्हणाले, नगर शहरातील बाजारपेठेची परंपरा खूप मोठी आहे. शहराच्या व जिल्ह्याच्या विकासात व्यापाऱ्यांचे मोठे योगदान आहे. नगर जिल्ह्याच्या विकासाचे नियोजन करण्यात येत आहे.अर्थमंत्र्यांनी घेतलेल्या परिषदांमधून जीवनावश्यक वस्तूवरील कर रद्द किंवा कमी करण्याचा निर्णय करून जनतेला आणि व्यापारी वर्गाला दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. आता हा कर भरण्यात सुध्दा सुसूत्रता आली आहे. करोना संकट काळानंतरही देशाची अर्थव्यवस्था स्थिर करण्यासाठी उपाय योजना करण्यात आल्या. त्यामुळे भारताची अर्थव्यवस्था प्रगतीच्या दिशेने जात आहे. जगातील इतर देशाची परिस्थिती पाहिली तर भारत देश अर्थिक दृष्ट्या सक्षम असल्याचे चित्र आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामुळे देश आर्थिक महासत्तेकडे वाटचाल करीत आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी छोट्या विक्रेत्यांपासून ते उद्योजकापर्यंत सर्वांनाच पाठबळ दिले आहे. सर्वाचे प्रयत्न देशाच्या अर्थव्यवस्थेला पाच ट्रिलीयन डॉलर अर्थव्यवस्थेचा मार्ग अधिक सुकर करून देतील, असा विश्वास पालकमंत्री विखे यांनी व्यक्त केला. नगर जिल्ह्याला विकास आराखडा तयार करण्यात आलेला आहे. त्यामध्ये औद्यगिक विकासाला प्राधान्य देण्यात आले आहे. तीर्थक्षेत्राचा विकास करून नवी बाजारपेठ विकसित करण्याच्या अनुषंगाने जिल्ह्याचा सांख्यिकी आरखाडा तयार करण्यात आलेला आहे, असेही विखे यांनी सांगितले.

# नगर शहरात रमजान ईद उत्साहात साजरी

**समाचार/नगर-दि.११**

नगर शहरासह जिल्ह्यात आज मुस्लिम समाजबांधवांनी रमजान ईद उत्साहात साजरी केली. सकाळी नमाज पठण झाल्यानंतर एकमेकांना ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

ईदच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाकडून नगर शहरात ठिकठिकाणी बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस प्रशासन लक्ष देऊन होते. पोलिस प्रशासनाकडून ईदच्या पार्श्वभूमीवर आज सकाळी कोठला येथील वाहतुकीत बदल करण्यात आला होता. पुण्याकडून नगरकडे येणारी वाहतूक जिपीओ चौक ते किल्ला चौक ते बेलेश्वर चौक ते न्यायनगर कोर्टमार्गे एसपी चौक, शेंडी बायपास मार्गे सुरू ठेवण्यात आली तसेच छत्रपती संभाजीनगरकडून पुण्याकडे जाणारी वाहतूक याच मार्गाने वळविण्यात आली होती.

# भारतात बेरोजगार तरुणांची संख्या दुप्पट

**नवी दिल्ली, दि. ११–** आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने इन्स्टिट्यूट ऑफ ह्युमन डेव्हलपमेंटच्या सहकार्याने देशातील तरुणांमधील रोजगाराच्या स्थितीबाबत एक आकडेवारी जारी केली आहे. त्यात म्हटले आहे की, ८३ टक्के तरुण बेरोजगार आहेत. या अहवालात सांगण्यात आले आहे की, एकूण बेरोजगार तरुणांमध्ये माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेल्या तरुणांची २००० मध्ये ३५.२ टक्के असलेली संख्या २०२२ मध्ये सुमारे दुप्पट होऊन ६५.७ टक्के झाली आहे.




भारतातील बेरोजगारीची ही परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याचे आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने म्हटले आहे. सुशिक्षित तरुणांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण जास्त आहे. इंडिया एम्प्लॉयमेंट रिपोर्टच्या अहवालात म्हटले आहे की, चांगल्या दर्जाच्या रोजगाराच्या संधी नसल्यामुळे उच्च शिक्षण घेतलेल्या तरुणांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण खूप जास्त आहे. उच्च शिक्षण घेणारे तरुण सध्या उपलब्ध असलेल्या कमी पगाराच्या नोकऱ्या किंवा असुरक्षित नोकऱ्यांमध्ये जाण्यास अजिबात तयार नाहीत. त्याऐवजी चांगल्या संधी निर्माण होईपर्यंत ते प्रतीक्षा पाहण्यास तयार आहेत. अभ्यासात सांगण्यात आले की करोना महामारीच्या काळात सुशिक्षित तरुणांमध्ये रोजगाराचा सर्वात जास्त अभाव दिसून आला. याशिवाय, जॉब मार्केटमध्ये सामील असलेल्या कामगारांचे पगार एक तर स्थिर राहिले आहेत किंवा कमी झाले आहेत.अहवालानुसार, २०१९ पासून नियमित कामगार किंवा स्वयंरोजगार शोधत तरुणांच्या वास्तविक वेतनात घट झाली आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने आपल्या अहवालात महिला कामगार कर्मचाऱ्यांच्या घटत्या सहभागाबाबत चिंता व्यक्त केली आहे. देशातील श्रमिक बाजारपेठेतील लिंग गुणोत्तर म्हणजेच पुरुषांच्या तुलनेत महिला कर्मचाऱ्यांची कमतरता हे मोठे आव्हान बनत आहे. तरुण महिलांमध्ये, विशेषत: उच्च शिक्षण घेतलेल्या महिलांमध्ये बेरोजगारीचे आव्हान भयावह आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने आपल्या अहवालात सुशिक्षित तरुणींमधील बेरोजगारीबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

संपादकीय

# आणखी एक धोक्याचा इशारा

भारतात धूर ओकणारी वाहने, शेतीत कचरा जाळण्याचे प्रकार, औष्णिक वीज केंद्रे, कालबाह्य वाहनांचे रत्यावरून धावणे, प्रदूषणाच्या बाबतीत पुरेशी जागरूकता नसणे, औद्योगिक प्रकल्पात प्रदूषणावर उपाययोजना करणाऱ्या यंत्रणांचा अभाव, उन्हाळ्यात डोंगरांना लागणारी आग, जमीन भाजण्याचे प्रकार यामुळे प्रदूषण वाढत आहे. त्याचबरोबर विकासाच्या नावाखाली पर्यावरणरक्षणाला दुय्यम स्थान देण्याचे प्रमाण वाढले आहे. एका अभ्यास अहवालानुसार, जगातील सर्वाधिक प्रदूषित राजधानी म्हणून नवी दिल्लीवर पुन्हा शिक्कामोर्तब झाले आहे; तर औद्योगिकीकरण –विकासापासून दूर असलेला बांगलादेश जगातील सर्वात प्रदूषित देश ठरला आहे. आश्चर्याची बाब म्हणजे फारसे विकसित नसलेले बिहारमधील बेगुसराय हे शहर जगात सर्वाधिक प्रदूषित महानगर होते आणि मेघालयातील एका शहराचा या यादीत समावेश होतो, हे आपल्या विकासाच्या संकल्पनेचा एकूणच पुनर्विचार करायला लावणारे आहे. जगातील दहा सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी नऊ, ५० पैकी ४२ आणि शंभरपैकी ८३ एकट्या भारतात आहेत. स्वीडनमधील हवेच्या गुणवत्तामापनाच्या तंत्रज्ञानात आघाडीवर असलेली आयक्यू एअर संस्था गेली सलग सात वर्षे साऱ्या जगातील हवा प्रदूषणाची विविध माध्यमातून माहिती संकलित करून अहवाल सादर करते. भारताला जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून अभिमान वाटतो; परंतु त्याचबरोबर जगातील सर्वात प्रदूषित शहरे असलेला देश म्हणून आपली प्रतिमा जगभर खराब होते. त्याची चिंता आपल्याला नाही. आयक्यू एअरने हवेच्या जागतिक गुणवत्तेवर जारी केलेल्या अहवालानुसार भारत जगातील तिसरा सर्वात प्रदूषित देश ठरला आहे. हे रँकिंग हवेतील २.५ मायक्रॉन किंवा त्यापेक्षा कमी कणांच्या घनतेवर (पीएम २.५) आधारित आहे. २०२३ मध्ये भारताची वार्षिक पीएम २.५ घनता ५४.४ मायक्रोग्रॅम प्रति घनमीटर होती. जगातील ५० सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी ४२ शहरे भारतात आहेत. नवी दिल्ली सलग दुसऱ्या वर्षी जगातील सर्वात प्रदूषित शहर म्हणून निदर्शनास आले आहे आणि २०२२ पासून तिची कामगिरी सतत खराब होत आहे. भारतातील शहरी भागात राहणाऱ्या आणि श्वासोच्छवासाच्या त्रासामुळे दररोज डॉक्टरांकडे जाणाऱ्या किंवा शहरांच्या प्रदूषित वातावरणात सतत राहणाऱ्यांसाठी ही आकडेवारी अजिबात धक्कादायक नाही. आयक्यू एअरच्या अहवालानुसार जागतिक आरोग्य संघटनेच्या ५ मिलीग्राम प्रति घनमीटरच्या मार्गदर्शक तत्त्वापेक्षा कमी असलेल्या भागात १.३६ अब्ज भारतीय राहतात. या यादीत बिहारचे बेगुसराय अव्वल स्थानावर आहे. २०२२ मध्ये हे शहर या यादीत समाविष्ट केले गेले नव्हते; परंतु येथे वार्षिक सरासरी पीएम २.५ घनता प्रति घनमीटर ११८ पेक्षा जास्त असल्याचा अंदाज आहे. गुवाहाटीमध्ये ही घनता २०२२ च्या पातळीपेक्षा दुप्पट झाली आहे. जीवाश्म इंधन जाळणे हा पीएम २.५ चा प्रमुख स्त्रोत असल्याने, देशातील खराब हवेची गुणवत्तादेखील दर्शवते की अक्षय ऊर्जेचा अवलंब करण्यासाठी पुरेसे प्रयत्न केले जात नाहीत. अजूनही देशाच्या एकूण वीज उत्पादनापैकी ७० टक्के वाटा औष्णिक ऊर्जा प्रकल्पांचा आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या रूफटॉप सोलर प्रकल्पासारख्या मोठ्या प्रकल्पांमध्येही परिस्थितीत मोठा बदल घडवून आणण्याची क्षमता आहे; मात्र त्यासाठी वीज संबंधित धोरणांमध्येही महत्त्वाचे बदल करावे लागतील. यासोबतच वायू प्रदूषणाच्या बाबतीत दिल्लीचे अव्वल स्थान हे दर्शवते की, पिकांचे अवशेष जाळण्याबाबत ठोस धोरणात्मक उपाय शोधण्यात आपण कमी पडत आहोत. २०१८ पासून सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत दिल्लीचे नाव चार वेळा आले आहे. जागतिक हवा गुणवत्ता अहवाल, २०२३ मध्ये १३४ देशांची यादी आहे. सात हजार ८१२ ठिकाणांवरील ३० हजारहून अधिक हवा गुणवत्ता निरीक्षण केंद्रांवरून तपशील गोळा करण्यात आला आहे. भारत २०२२ मध्ये जगातील आठवा सर्वाधिक प्रदूषित देश होता. त्यावेळी देशाचा पीएम २.५ स्तर सरासरी ५३.३ मायक्रोग्रॅम प्रति घनमीटर होता. आरोग्य संघटनेने पाच मायक्रोग्रॅम प्रति घनमीटर ही स्वीकारार्ह पातळी मानली आहे. अर्थात, जीवाश्म इंधन आणि हवेत सोडला जाणारा कार्बन डायऑक्साईड प्रदूषणाचा ६५ टक्के वाटेकरी आहे. बिहारसारख्या गरीब राज्यात इंधनासाठी स्वयंपाकाच्या गॅसऐवजी केलेला सरपण किंवा तत्सम घटकांचा वापर समस्येत भर घालत आहे. भारतात हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी कठोर पावले उचलली जाणार नाहीत, तोपर्यंत नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरूच राहणार आहे. प्रदूषित हवेतील घातक कण विविध मार्गांनी शरीरात प्रवेश करतात, ते रक्तातही मिसळतात. फुफ्फुस आणि श्वासनलिकेचा दाह आणि त्यासंबंधीचे इतर आजार बळावतात. पार्किन्सनपासून कर्करोगासह विविध आजारांचे मूळ प्रदूषित हवेमध्येच आहे. त्यामुळे प्रदूषणावर मात करण्यासाठी सरकारने तातडीने उपाययोजना केल्या पाहिजेत. त्यासाठी लोकांमध्येही जाणीव-जागृती वाढायला हवी.

# कीर्तन महोत्सवास केडगावात प्रारंभ



**समाचार/नगर-दि.११**

गुढीपाडव्या निमित्त केडगाव, शाहूनगर रोड येथील पाच गोडाऊनच्या प्रांगणात किर्तन महोत्सवाला प्रारंभ झाला आहे. जनसेवक अमोल येवले मित्र मंडळ व छत्रपती फाउंडेशनच्या (ट्रस्ट) वतीने आयोजित केलेल्या किर्तन महोत्सवाला पंचक्रोशीतील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. किर्तन महोत्सवाचे हे तिसरे वर्ष आहे.

किर्तन महोत्सवाचे पहिले पुष्प स्व. सुभाष कोंडीराम वाघ यांच्या स्मरणार्थ ह.भ.प. किशोर महाराज दिवटे यांनी गुंफले. कीर्तनात दिवटे महाराज म्हणाले की, जीवनात समाधान पाहिजे असेल, तर देवाचे नाम चिंतन केले पाहिजे.स्वप्नात सुध्दा देवाचे नाम चिंतन झाले पाहिजे. त्याचा परिणाम आपल्या जीवनात समाधान, सुख मिळते. मनुष्य जेवताना आनंदाचे लाडू खाऊ लागतो. अंगावरचे कपडे सुध्दा आनंदाचे धारण केले. सर्व सुख, सर्व अलंकार लोक अंगावर परिधान करतात. त्यापेक्षा देवाचे चिंतन करून आनंदाचे अलंकार परिधान केल्यास जीवन सुखी, समाधानी होणार आहे व ते कायमस्वरूपी टिकणारे आहेत.

# पोस्टल इन्स्पेक्टरपदी देविदास गोरे यांची निवड



**समाचार/नगर-दि.११**


अहमदनगर प्रधान डाकघर येथे डाक सहाय्यक म्हणून कार्यरत असणारे देविदास गोरे हे खाते अंतर्गत परीक्षा उत्तीर्ण होत इनस्पेक्टर ऑफ पोस्ट यापदी त्यांची निवड झाली व प्रथम मुंबई येथे करण्यात आली.

पोस्टल संघटनेचे राज्याचे कार्याध्यक्ष संतोष यादव यांनी गोरे यांच्या कार्याचा विशेष उल्लेख करत,आपणास मिळालेले यश हे निश्चितच कौतुकास्पद असून आपली प्रशासकीय अधिकारी म्हणून झालेल्या निवडीचा आम्हास सार्थ अभिमान आहे, असे सांगितले.

यावेळी दिपक कुंभारे, नितीन थोरवे, दिपक शिंदे,अरुण रोकडे,सतिष येवले, कमलेश मिरगणे, सागर पंचारिया, आश्विनी चिंतामणी, रुपाली निसळ, आश्विनी फुलकर, सुभाष बर्डे यांच्या सह मोठ्या संख्येने डाक कर्मचारी उपस्थित होते.

# ‘कृत्रिम सूर्याची’ निर्मिती

विज्ञान भारती



‘कृत्रिम सूर्याची’ निर्मिती ही संकल्पनाच खरे तर आपल्यातील अनेकांना कल्पनाशक्तीच्या बाहेरची वाटत असेल. पण ही खरी बाब आहे.

याच महिन्यात दक्षिण कोरियाच्या शास्त्रज्ञांनी कृत्रिम सूर्यामध्ये दहा कोटी अंश सेल्सिअस तापमान तयार केले व हे तापमान त्यांनी ४८ सेकंदे कायम ठेवले व एक नवा जागतिक विक्रम केला. हे तापमान सूर्याच्या गाभ्यापेक्षा तब्बल सात पटीने जास्त आहे.

या आधी चीनच्या ‘हेफेई इन्स्टिट्यूट ऑफ फिजिकल सायन्सेस’ या संस्थेमध्ये एक्सपेरिमेंटल डव्हान्स सुपरकंडक्टिंग टोकामाक’, हा एक ऊर्जा निर्मितीशी संबंधित प्रकल्प आहे. या प्रकल्पात ज्याप्रमाणे सूर्य ऊर्जा तयार करतो, हायड्रोजनचे दोन अणु एकत्र येऊन हेलियमचा एक अणू तयार करतो व मोठ्या प्रमाणावर ऊर्जा करतो. अगदी तशीच नैसर्गिक ऊर्जा निर्मितीची प्रक्रिया प्रयोगशाळेमध्ये करण्याचे प्रयत्न या संस्थेत चालू आहेत.

आपणा सर्वांना माहीतच आहे की काही वर्षांपूर्वी चीनने त्यांच्या हेफेई येथील न्यूक्लिअर फ्युजन रिऍक्टर मधुन १७ कोटी अंश सेल्सिअस इतकी ऊर्जा निर्माण केली व ती जवळजवळ १७ मिनिटांपर्यंत टिकवली. अश्याप्रकारे इतक्या मोठ्या प्रमाणावर ऊर्जा निर्मिती करण्याची ही जगातील प्रथमच वेळ होती. याच्या आधी चीननेच अशा प्रकारच्या कृत्रिम सूर्यामधून १.२ कोटी अंश सेल्सिअस इतकी ऊर्जा निर्माण केली होती.

अश्या प्रकारची ऊर्जा निर्माण करण्यासाठी एक विशिष्ट प्रकारची अणुभट्टी उभारली जाते. तिलाच ‘टोकामॅक’ असेही म्हणतात. आपल्या भारताने सुद्धा १९८९ मध्ये ‘आदित्य नावाचा एक छोटा टोकामॅक बनवला आहे. तो ‘इन्स्टिट्यूट फॉर प्लाझ्मा रिसर्च’ अहमदाबाद येथे सध्या कार्यरत आहे.

अशा प्रकारच्या अणुभट्टीमध्ये मोठ्या प्रमाणावर प्लाझ्माचे तापमान वाढवणे शक्य होते. सर्वात मुख्य म्हणजे अश्या प्रकारच्या अणुभट्टीला विशिष्ट चुंबकीय क्षेत्र व निर्वात पोकळी या अति अतिउच्च तंत्रज्ञानाची अशी सांगड घातली जाते की आतील वाढलेल्या अति उच्च तापमानाचा अणुभट्टीच्या बाहेरील आवरणावर काही परिणाम होत नाही किंवा जवळील कोणत्याही पदार्थाला ती उष्णता जाणवणार नाही. थोडक्यात ती अणुभट्टी पूर्णपणे सुरक्षित राहते. न्यूक्लियर फ्युजन या तंत्रज्ञानाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे अत्यंत थोड्या इंधनापासून यामध्ये मोठ्या प्रमाणावर ऊर्जा तयार होऊ शकते. तेवढीच ऊर्जा आपण आपली सध्याची साधने वापरून करायची म्हणल्यास ती साधने हजारो पटीने वापरावी लागतील. आता आपल्याला समजले असेल की अब्जावधी वर्षांपासून सूर्य कश्या प्रकारे संपूर्ण सूर्यमालेला उष्णता पुरवत असेल.

अशा प्रकारच्या अनुभंजना आधारित ऊर्जा निर्मितीचा सर्वात मोठा फायदा म्हणजे याच्यामध्ये घातक किरणोत्सार्ग होत नाही. कोणत्याही प्रकारचा आण्विक कचरा तयार होत नाही तसेच कार्बन प्रदूषणा शिवाय ऊर्जा निर्मितीची क्षमता प्राप्त होते. त्यामुळे ही प्रक्रिया अत्यंत पर्यावरण पूरक आहे. यासाठी हायड्रोजनची समस्थानिके ड्युटेरियम व ट्रीटीएम वापरले जातात. यामध्ये जी आव्हाने असतात ती म्हणजे सूर्याच्या गाभ्यात प्रचंड दाबामुळे हे अनुभंजन होते ते पृथ्वीवर करणे अवघड असते. पृथ्वीवर इतका प्रचंड दाब तयार करणे हे शक्यच नाही. त्यामुळे या समस्थानिके असलेल्या अणुभट्टी मध्ये तापमान प्रचंड प्रमाणात वाढवले जाते. यामुळे हि अणुकेंद्रके एकत्र आणली जातात व त्यातून प्लाझ्मा तयार होतो. हा प्लाझ्मा म्हणजे एक प्रकारे आयोनायझेशन झालेला वायू आहे. हि पदार्थांची चौथी अवस्था आहे.

मानवाला असिमित व अत्यंत स्वच्छ ऊर्जा मिळावी याकरता अनेक देशांमध्ये जोरदार प्रयत्न चालू आहेत. चीनच्या व दक्षिण कोरियाच्या या यशामुळे आता सर्वांचीच आपल्या देशात कृत्रिम सूर्य तयार करण्याची एक चुरस निर्माण झालेली आहे. आपला भारतही अश्याच एका आंतरराष्ट्रीय कार्यक्रमाचा भाग आहे. International Thermonuclear Experimental Reactor (ITER) हा भारतासह अमेरिका, रशिया, चीन, इंग्लंड, जर्मनी व फ्रान्स या देशांचा सहभाग असलेला प्रकल्प फ्रान्स येथे आकार घेत आहे. लवकरच या कार्यक्रमांतर्गत ते या कृत्रिम सूर्याची चाचणी घेणार आहेत. त्या प्रयत्नाला यश लाभो या सदिच्छा.

**- डॉ.दत्ता पोंदे**

मोबाईल- ७३८७९००७००




## राशीभविष्य

- **मेष** : मन शांत ठेवून निर्णय घ्या. अडचणींवर युक्तीने मार्ग काढावे लागतील. अर्थप्राप्ती वाढेल.
- **वृषभ** : कार्यक्षेत्रातील सहकाऱ्यांबरोबरचे मतभेद वेळीच मिटवावे लागतील. कौटुंबिक आनंदात भर पडेल.
- **मिथुन** : पैशाचा विनियोग योग्य पद्धतीने करा. सरकारी कामात यश मिळेल. पित्तविकार बळावेल.
- **कर्क** : सामाजिक कार्यात नावलौकिक होईल. पोटाच्या तक्रारी वाढण्याची शक्यता. आरोग्याकडे लक्ष द्या.
- **सिंह** : महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागतील. सामाजिक कार्यात नावलौकिक वाढेल. सामंजस्य राखा.
- **कन्या** : गुंतवणुकीचा निर्णय घेऊ नका. प्रवासात तब्येत सांभाळणे आवश्यक ठरेल. गैरसमज होईल.
- **तूळ** : प्रलोभने टाळा. सर्व काही सुरळीत चालू असताना मध्येच अडचणी उत्पन्न होण्याची शक्यता.
- **वृश्चिक** : कौटुंबिक जीवनात काही तडजोडी कराव्या लागतील. उत्तरार्धात कामाचा वेग वाढवावा लागेल.
- **धनु** : आर्थिक निर्णय घेताना तज्ज्ञांचा सल्ला घेणं श्रेयस्कर ठरेल. शाब्दिक चकमकी टाळा.
- **मकर** : कार्यक्षेत्रात गुप्तशत्रूंच्या हालचाली थंडावतील. कुटुंबातील इतरांच्या भावनांचाही आदर राखा.
- **कुंभ** : नोकरी-व्यवसायात प्रगतीच्या संधी सामोऱ्या येतील. महिलांचा धार्मिक कार्यात सहभाग राहील.
- **मीन** : तब्येतीच्या तक्रारी राहण्याची शक्यता आहे. मित्रपरिवारात वावरताना मर्यादांचं पालन करा.

## १२ एप्रिल

दिन विशेष

- २०१५ : सानिया मिर्झा दुहेरीच्या वैयक्तिक जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर
- २०१६ : लॉजिस्टिक एक्स्चेंज करार करण्यास भारत-अमेरिका या दोन्ही देशांची तत्वत: मान्यता.
- २०१७ : लिअँडर पेस आणि महेश भूपती यांच्यातील वादाचे पडसाद केंद्र सरकारच्या पातळीवर उमटले.
- २०१८ : व्यवस्थापन आणि अभियांत्रिकीचे विद्यार्थी कमी झाल्याच्या परिणामस्वरुप देशातील २४३ महाविद्यालये बंदचा प्रस्ताव.

आरोग्यमंत्र

## खोकला येतोय ?

सध्या खोकल्याने ग्रस्त रुग्णांची संख्या नोंद घेण्याइतकी वाढली आहे. बराच काळ टिकलेला खोकला काळजी वाढवतो. म्हणूनच तो वेळीच थांबवण्यासाठी आणि त्यापोटी उद्भवणाऱ्या समस्यांवर मात करण्यासाठी तातडीने उपाय योजायला हवेत. याकामी सर्वप्रथम कफ सिरप, इनहेलर्स आणि ॲलर्जीविषयक औषधं कायम जवळ ठेवा. खोकला येणार असं वाटलं की ही औषधं घ्या.



✻ सततच्या खोकल्यामागे ॲलर्जी हे कारण असू शकतं. त्यामुळे डॉक्टरांशी बोलून खोकल्याचं नेमकं निदान करून घ्या. ॲलर्जीवरची औषधं घ्या. ✻ खोकला आल्यावर आपण पाणी पितो. पण थंड पाण्याऐवजी गरम पेयांचा पर्याय निवडा. ग्रीन टी, आलं घातलेला चहा, लिंबू आणि मधाचा चहा हे पर्याय आहेत. लिंबू आणि मधाच्या चहामुळे खोकला थांबू शकतो. मध घालून गरम दूध प्या. ✻ वातावरणातल्या बॅक्टेरियांमुळेही खोकला होतो. अशा वेळी खोलीबाहेर पडून गारवा असलेल्या ठिकाणी जा. थंडीतल्या कोरड्या वातावरणामुळेही खोकला होतो. यासाठी घरात हिटर वापरा. घरातली आर्द्रता टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करा. नाकाने मंद गतीने श्वास घ्या. खोकल्याची उबळ कमी झाली की गरम पेय प्या. चमचाभर मध खा. यामुळे घशाची खवखव कमी होईल. ✻ सतत खोकला येत असेल तर ॲरोमाथेरेपीचा पर्याय तुमच्याकडे आहे.

महत्त्वपूर्ण काही...

## उष्णतेशिवाय उकळी ?

उष्णतेशिवाय पाण्याला उकळी येणं शक्य नाही. पण पाण्याच्या किंवा खरं तर कोणत्याही द्रवपदार्थाच्या नैसर्गिक गुणधर्मांचाच वापर करत पाण्याला उष्णतेशिवाय उकळी आणणं शक्य आहे. पाणी हे निसर्गात घन, द्रव आणि वायू अशा तिन्ही अवस्थांमध्ये अस्तित्वात असतं. ते एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत जातं तेव्हा रेणूंच्या बंधनांवर परिणाम होतो. द्रवरूपात असताना पाण्याचे रेणू एकमेकांना घट्ट धरुन असतात. त्यामुळेच काचेच्या भांड्यात पाणी ठेवलं तर भांड्याच्या तोंडाशी फुगवटा येतो; पण त्याच वेळी त्यावर हवेचा दाबही पडलेला असतो. तो पाण्याच्या रेणूंना खालच्या दिशेनं दाबतो. पाणी तापवतो तेव्हा त्याला मिळालेली उष्णता पाण्याच्या रेणूंना ऊर्जा देते. ती ऊर्जा मग त्यांना एकमेकांबरोबर असलेल्या बंधनांवर मात करून दूर जायला मदत करते. उष्णता मिळते तसे हे रेणू आपल्याच भाईबंदांच्या ओढीवर मारत करतातच, त्याचबरोबर हवेच्या दाबावरही मात करत हवेत जातात. म्हणजे हवेच्या दाबाला न जुमानता बरेच रेणू उडून जाऊ पाहतात, तेव्हा पाण्याला उकळी येते असं आपण म्हणतो.

लक्षवेधी

## प्लॅस्टिकचा भस्मासूर

प्लॅस्टिकचा वाढता वापर अनेक समस्यांना जन्म देत असतो. याबाबतची चर्चा करताना पाण्याच्या बाटल्या आणि खाद्यपदार्थांच्या पाकिटांमधलं प्लॅस्टिकच पुढे मायक्रोप्लॅस्टिकमध्ये बदलतं हे लक्षात घेणे गरजेचे आहे. एका संशोधनात २३ टक्के लोकांमध्ये पॉलिथिलीन आढळून आलं, जे प्लॅस्टिकच्या पिशव्यांमध्ये आढळतं. केवळ एका व्यक्तीमध्ये पॉलीमिथाइल मेथाक्रिलेट (पीएमएमए) आढळून आलं. कोणत्याही रक्त नमुन्यात पॉलीप्रॉपिलीन आढळलं नाही. प्लॅस्टिक हे हवेतून तसंच खाण्या-पिण्याच्या माध्यमातून मानवी शरीरात प्रवेश करू शकतं. खाताना. पाणी पिताना आणि श्वास घेताना प्लॅस्टिकचे छोटे कण शरीरात जात असल्याची जाणीव लोकांना नसते. मायक्रोप्लॅस्टिक्स दिसायला लहान असले तरी विविध रोगांचे कारण ठरू शकते. मायक्रोप्लॅस्टिक कण मानवी शरीरातदेखील फिरू शकतात, असे शास्त्रज्ञ सांगतात. त्यामुळेच प्राणघातक रोगांची संभावना वाढते. म्हणूनच या विषयावर अजून संशोधनाची गरज आहे.

## पंचांग

**शुक्रवार, १२ एप्रिल २०२४**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
चैत्र शु. ४, नक्षत्र : रोहिणी,
चंद्रराशी : वृषभ, सौभाग्य योग
सूर्योदय ६.२६, सूर्यास्त : १८.५३

## फॉरवर्डस

**स्वप्नं फक्त बघायची नसतात, ती पूर्ण करण्यासाठी धडपडही करायची असते. म्हणूनच**
ख्वाहिशे क्यूं ना छोटीसी हो,
लेकिन इसे पुरा करने के लिए
जिद्दी होना चाहिए...
या ओळी आठवतात.

सौंदर्यसाधना

हॉट स्टोन थेरपीची परिणामकारकता जाणून घेतल्यानंतर त्याचा वापर कसा होतो हे पाहू या. यामध्ये थोडा दाब देऊन, अंगावर गोलाकार फिरवून विशिष्ट अवयवावर हॉट स्टोन ठेवले जातात. या दगडांमधली उष्णता शरीरात शोषली गेल्याने रक्तवाहिन्या मोकळ्या होतात. रक्तप्रवाह वाढल्याने शारीरिक वेदना कमी होतात. शरीर आरामदायी स्थितीत जातं. ही थेरपी करून घेण्याआधी आणि नंतर हलका आहार घ्यावा. हॉट स्टोन थेरपीमुळे शरीरातल्या पाण्याची पातळी कमी होते. त्यामुळे भरपूर पाणी प्यावं. उच्च रक्तदाबाचा त्रास असलेल्यांनी हॉट स्टोन थेरपी घेणं टाळावं.

करिअरवाटा

## अभिनयक्षेत्रातील वाटचाल

अभिनयात रुची असेल तर कारकिर्द घडवण्यासाठी या क्षेत्राचा विचार करणं योग्य ठरेल. भारतातल्या अनेक विद्यापीठांनी नाट्यशास्त्राचे पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू केले आहेत. सध्या नाटकापेक्षासुद्धा टी.व्ही. आणि चित्रपट निर्मितींना आलेलं महत्त्व लक्षात घेऊन फिल्म ॲन्ड टी.व्ही. इन्स्टिट्यूटचा अभ्यासक्रमही उपयुक्त सिद्ध होणारा आहे. खाजगी संस्थांना किंवा विद्यापीठांना या धर्तीवरचा अभ्यासक्रम सुरू करणं अवघड जाते. कारण चित्रपट निर्मितीचा अभ्यासक्रम शिकवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर साधनसामुग्री आवश्यक असते. म्हणूनच टी.व्ही. आणि फिल्म या दोन तंत्रांचा अभ्यास करायचा असेल त्यांना पुण्याच्या सरकारी मालकीच्या इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश घेण्याशिवाय पर्याय नाही. याचा विचार करून अन्नपूर्णा इंटरनॅशनल स्कूल ऑफ फिल्म ॲन्ड मीडिया अशी संस्था हैदराबादेत कार्यरत आहे. ही संस्था पुण्याच्या इन्स्टिट्यूटला पूर्णपणे पर्यायी ठरत आहे. या संस्थेमधील अभ्यासक्रम थोडा वेगळा आहे. हा चित्रपट, टी.व्ही. माध्यमे, ॲनिमेशन आणि व्हीएफएक्स यांच्या एमबीएच्या अभ्यासक्रमात बसण्याजोगा आहे. या अभ्यासक्रमामध्ये पदवी, पदव्युत्तर असेही अभ्यासक्रम वेगळे आहेत. ही भारतातीलच नव्हे तर आशिया खंडातली अशा प्रकारची सर्वात मोठी संस्था आहे.



खेचाखेची

## डिझायनर पीस...

पती-पत्नी फिरायला बाहेर पडले होते. चालताना पतीच्या पायाला ठेच लागली, बोटातून रक्त येऊ लागलं. त्यानं पत्नीकडे पाहिलं. त्याला वाटलं पत्नी ओढणी फाडेल आणि जखमेवर बांधेल. पत्नीने त्याच्या नजरेतले भाव ओळखले आणि म्हणाली,

.
.
.

‘तसा विचारही करु नका. डिझायनर पीस आहे.’

बालमानस

मित्रांनो; बदाम आणि आक्रोडमुळे मेंदू, हृदय, त्वचा तसंच केसांचं आरोग्य सुधारतं हे तुम्हीला माहिती आहे का? एवढंच नव्हे तर या सुक्यामेव्यामुळे तुमची रोगप्रतिकारक शक्तीही वाढते. त्यामुळे उन्हाळ्यात बदाम आणि आक्रोडचं सेवन करायला हवं. सीताफळाच्या बिया, टरबुजाच्या बिया तसंच जवस खायलाही हरकत नाही. या बियांमध्ये झिंक, लोह, कॅल्शियम, पोटॅशियम, सेलेनियम आदी पोषक घटक असतात. अळशीमध्ये ओमेगा थ्री आणि फायबर मुबलक प्रमाणात असतं. या घटकांमुळेही शरीराला बरेच लाभ मिळतात. अळशीमुळे मेंदू तसंच आतड्यांचं आरोग्य उत्तम राहतं. या बिया भिजवण्याऐवजी वाळवून भाजून खाणे चांगले.

## गुणकारी सेटिंग स्प्रे

सौंदर्यसाधना

मेक अप टिकवून ठेवण्यासाठी सेटिंग आणि फिनिशिंग स्प्रे बाजारात मिळतात. पण असे रसायनयुक्त स्प्रे वापरण्याऐवजी तुम्ही घरच्या घरीही मेक अप टिकवणारे स्प्रे तयार करू शकता.



साहित्य- दोन टेबलस्पून व्हेजिटेबल ग्लिसरीन, आठ टेबलस्पून गुलाबपाणी, दोन टेबलस्पून विच हॅजल तेल, चार टेबलस्पून पाणी, दोन थेंब खोबरेल तेल, एक स्प्रे बॉटल इत्यादी.

कृती- स्प्रे बॉटलमध्ये ग्लिसरीन, गुलाबपाणी आणि विच हॅजल तेल मिसळून घ्यावं. त्यानंतर या मिश्रणात पाणी घालावं आणि बाटली चांगली हलवून घ्यावी. हे सर्व साहित्य चांगल्या प्रकारे मिसळलं गेल्यानंतर त्यात खोबरेल तेल मिसळावं. मेक अपनंतर या मिश्रणाचा चेहऱ्यावर हलका स्प्रे करावा. काही काळ स्प्रे सुकू द्यावा. घरच्या घरी तयार होत असल्यामुळे शुद्धतेची खात्री असते. यात कोणतेही हानिकारक घटक नसल्याने त्वचेचं नुकसान होत नाही. या स्प्रेमुळे मेक अप बराच काळ टिकून राहतो. पण हा स्प्रे प्रमाणात फवारायला हवा. अन्यथा तुमचा लूक बिघडू शकतो. चेहऱ्यापासून योग्य अंतर राखत स्प्रे करावं.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist.Ahmednagar, Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist Ahmednagar, Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ‘‘समाचार’’ ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प), जिल्हा-अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

# समाचार

गुरुवार, दि. ११ एप्रिल २०२४ पान ३

**सुविचार**

राग आल्यावर थोडं थांबलं आणि चूक झाल्यावर नमलं तर जगातील सर्व समस्या दूर होतील. **संकलित**

**सामान्यज्ञान**

अमेरिकेच्या पहिल्या हवाई सुंदरीने १५ मे १९३० मध्ये ऑकलंड एअरपोर्ट कॅलिफोर्निया येथे ट्राय मोटार बोईंग ८० ए या विमानात ११ प्रवाशांचे स्वागत केले. **संकलन - अरविंद ब्राम्हणे**

पान १ वरुन

## वळसेंचा निकटवर्तीय शरद पवारांच्या गळाला

सोपवली आहे. आज शरद पवार यांच्या पुण्यातील निवासस्थानी शेखर पाचुंदकर यांनी शरद पवारांची भेट घेतली. त्यानंतर पवारांनी पाचुंदकर यांना हे नियुक्त पत्र दिले आहे. आंबेगाव विधानसभा मतदारसंघात शिरूर तालुक्यातील जे ४२ गाव येतात त्या ४२ गावांचा अध्यक्ष म्हणून शेखर पाचुंदकर हे काम पाहत होते. पाचुंदकर हे गेल्या २० वर्षांपासून दिलीप वळसे पाटील यांच्यासोबत काम करत होते. मात्र वळसे पाटील यांनी अजित पवार यांची साथ देण्याचा निर्णय घेतल्यानंतर पाचुंदकर यांनी शरद पवार यांच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतला आहे.

### सामाजिक सलोख्यासाठी टिफीन बैठकीचे आयोजन

# भाजपाच्यावतीने महात्मा फुले जयंती साजरी

**समाचार/नगर-दि.११**

महात्मा ज्योतिबा फुले हे थोर समाजसुधारक होते. बहुजन समाजाला शिक्षण देऊन मुख्य प्रवाहात आणण्याचे काम त्यांनी केले. त्यांच्या विचारांचा आदर्श आणि वारसा जपणे, ही आजच्या काळाची गरज आहे.

'कांदा, मुळा भाजी अवघी विठाई माझी' या उक्तीप्रमाणे सर्व समाजबांधवांनी सामाजिक सलोखा टिकविण्यासाठी एकत्र येण्याची गरज आहे. त्याअनुषंगाने आज भारतीय जनता पार्टीचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली व महानगर जिल्हाध्यक्ष अ‍ॅड.अभय



आकरकर यांच्या मार्गदर्शनाखाली थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी नगर महानगराच्यावतीने माळीवाडा येथे टिफीन बैठक आयोजित करण्यात आली होती. सुरुवातीला महात्मा फुलेंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी भाजपा ज्येष्ठ नेते वसंत लोढा, सचिन पारखी, प्रशांत मुथ्था, पंडित वाघमारे, बाबासाहेब सानप, किशोर डागवाले, संजय ढोणे, बाळासाहेब भुजबळ, अनिल निकम, महेश तवले, प्रिया जानवे, ज्योती दांडगे, गोपाल वर्मा, बाळासाहेब गायकवाड, करण डापसे, बाळासाहेब खताडे, शरद मुरतडकर, सुनील भिंगारे, सुनील सकट, दत्ता गाडळकर, अमोल निस्ताने, रेखा विधाते, सोमनाथ चिंतामणी, दीपक देहेरेकर, उमेश साठे, विशाल साठे, अभि शिंदे, शशिकांत पालवे, चंद्रकांत पाटोळे, विशाल खैरे, विजय गायकवाड, संदेश रफारीया, भागवत तुरधने, सचिन पळशीकर, श्रीकांत फंड, अ‍ॅड. चंदन बारटक्के, विक्रम शिंदे, महेश नामदे, अनिल सबलोक, साहेबराव विधाते, सुहास पाथरकर आदि उपस्थित होते.

यावेळी वसंत लोढा, सचिन पारखी, बाळासाहेब भुजबळ, जानवे आदींनी मनोगत व्यक्त केले. भाजपाचे ४०० पारचे स्वप्न यावेळी पूर्ण होईल असा विश्वास वसंत लोढा यांनी व्यक्त केला.

# राहुरीत २८ रोजी मैदानी स्पर्धा

**समाचार/नगर-दि.११**

अहमदनगर जिल्हा थलेटिक्स संघटनेच्या वतीने महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी क्रीडा भवन येथे २८ एप्रिल रोजी खुल्या गटातील पुरूष व महिलांसाठी थलेटिक्स (मैदानी) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग नोंदविण्याचे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.



थलेटिक्स स्पर्धेत १००, २००, ४००, ८००, १५०० व ५००० मीटर धावणे, लांब उडी, तिहेरी उडी, गोळा फेक, थाळी फेक, भाला फेक, ११० व ४०० मीटर हार्डल्स आणि २० कि.मी. चालणे स्पर्धा होणार आहे. १६ वर्षे पूर्ण झालेल्या खेळाडूंना या स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. भाला फेक व हातोडा फेकच्या खेळाडूंना आपल्या स्वतःचा भाला व हातोडा बरोबर घेऊन येण्याचे सांगण्यात आले आहे.

स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना गुणवत्ता प्रमाणपत्र देण्यात देणार आहे. पहिल्या तीन क्रमांकाच्या खेळाडूंची पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात येणार आहे. राज्यस्तरीय स्पर्धा २३ मे ते २५ मे या कालावधीत नागपूर येथे होणार आहे. सहभागी सर्व खेळाडूंना सहभाग प्रमाणपत्र मिळणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ऑफलाईन प्रवेश अर्ज स्पर्धेच्या दिवशी सकाळी ८ वाजेपर्यंत जमा करण्याचे सांगण्यात आले आहे.

## फुटबॉल स्पर्धेसाठी उद्या निवड चाचणी

**समाचार/नगर-दि.११**

अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनच्या २० वर्षा खालील खेळाडूंसाठी होणाऱ्या स्वामी विवेकानंद नॅशनल फुटबॉल चॅम्पियनशीप स्पर्धेसाठी जिल्हास्तरीय निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. ही निवड चाचणी १२ एप्रिल रोजी भुईकोट किल्ला येथील फुटबॉलच्या मैदानावर होणार असून, यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन सचिव रौनप फर्नांडीस यांनी केले आहे.

या निवड चाचणीत सहभागी झालेल्या खेळाडूंमधून दोन खेळाडूंची निवड मुंबई येथे २२ एप्रिल रोजी होणाऱ्या महाराष्ट्राच्या संघ निवडीसाठी प्रशिक्षण शिबिरात पाठविण्यात येणार आहे. १२ मे पासून नारीनपूर, छत्तीसगढ येथे स्वामी विवेकानंद नॅशनल फुटबॉल चॅम्पियनशीप स्पर्धा रंगणार आहे. जिल्ह्यातील उत्कृष्ट खेळाडूंना महाराष्ट्राच्या संघात जाण्याची संधी या निवड




चाचणीद्वारे उपलब्ध होणार असल्याची माहिती प्रदीप जाधव, व्हिक्टर जोसेफ व जेव्हिअर स्वामी यांनी दिली.

शहरात होणाऱ्या निवड चाचणीत २० वर्षा आतील १ जानेवारी २००५ नंतर जन्मलेले व ३१ डिसेंबर २००% च्या आतील जन्म झालेल्या खेळाडूंना सहभागी होता येणार आहे.

## 'महात्मा फुले यांची ग्रंथ संपदा दिशादर्शक'

**समाचार/नगर-दि.११**

समाजाला प्रबोधनाची व सामाजिक परिवर्तनाची वाट दाखविण्यासाठी जोतिबांनी लिहिलेले ग्रंथ आजच्या काळातही दिशादर्शक व प्रेरणादायी ठरत आहे. मराठा पतसंस्थेच्या माध्यमातून थोर समाजासेवकांचा आदर्श समोर ठेवून विविध उपक्रमातून समाजोन्नत्तीचे काम केले जात आहे, असे प्रतिपादन मराठा पतसंस्थेचे संचालक सतीश इंगळे यांनी केले.



अहमदनगर जिल्हा मराठा नागरी सहकारी पतसंस्थेच्यावतीने क्रांतीसूर्य महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त मार्केट यार्ड येथील शाखेत त्यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी बाळकृष्ण काळे, उदय अनभुले, तारकराम झावरे, शिरिष राऊत, अनुपमा सोनाळे, पुष्पा इंगळे, तेजस कासार आदि उपस्थित होते. उदय अनभुले यांचे भाषण झाले. प्रास्तविकात बाळाकृष्ण काळे यांनी पतसंस्थेच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती दिली.

# मनपा कर्मचारी पतसंस्थेतर्फे महात्मा फुले जयंती साजरी




**समाचार/नगर-दि.११**

महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपले संपूर्ण आयुष्य महिला आणि दलितांच्या हक्कांसाठी समर्पित केले त्यांचे विचार आजही समाजाला दिशा देणारे आणि प्रेरणादायी ठरत आहे असे प्रतिपादन अध्यक्ष किशोर कानडे यांनी केले, अहमदनगर मनपा कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी उपाध्यक्ष सोमनाथ सोनवणे, तज्ञ संचालक जितेंद्र सारसर, ज्येष्ठ संचालक बाबासाहेब मुदगल, सतीश ताठे, विकास गीते, श्रीधर देशपांडे, बलराज गायकवाड, अजय कांबळे, बाळासाहेब गंगेकर, बाळासाहेब पवार, विजय कोतकर, कैलास चावरे, गुलाब गाडे, मनपा कामगार युनियनचे सचिव आनंद वायकर, उपाध्यक्ष नंदकुमार नेमाणे, पंडित वाघमारे, राजेश सातपुते, संचालिका प्रमिला पवार, उषा वैराळ, कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी आदी उपस्थित होते.

# महात्मा फुले यांनी तळागाळापर्यंत शिक्षण पोहवण्याचे महान कार्य केले- खा. विखे

**समाचार/नगर-दि.११**

महात्मा फुले यांनी सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील समाजापर्यंत शिक्षण पोहचवण्याचे महान कार्य केले आहे. त्यांच्या कार्याचा महाराष्ट्राला कधीच विसर पडणार नाही, असे प्रतिपादन खा. सुजय विखे यांनी केले. महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त राहुरी येथे अभिवादन केले. त्यावेळी ते बोलत होते.



खा. सुजय विखे यांचा लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर मतदारसंघात दौरे सुरू आहे. राहुरी शहरात सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेस जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजी कर्डिले होते. यावेळी खा. विखे आणि कर्डिले यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करूनअभिवादन केले.

खा. विखे म्हणाले की, शिक्षणाचा प्रसार आणि प्रचारासाठी महात्मा फुले यांनी मोठे कष्ट घेत तळागळातील समाजाला शिक्षणाच्या माध्यमातून मुख्य प्रवाहात आणले. त्यासाठी त्यांनी सावित्रीबाई फुले यांना दिलेली साथ अनेमोल होती.

ते पुढे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मागील १० वर्षात मोठी विकास कामे केली असून विकास हाच आपला अजेंडा असणार आहे. येणाऱ्या काळातही जिल्ह्याच्या विकासासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### अवधूत गुप्ते यांच्या सुरमयी स्वरांनी नगरकर मंत्रमुग्ध

# सुमधुर गीतांनी रंगला रसिकोत्सव सांस्कृतिक सोहळा

**समाचार/नगर-दि.११**

आम्ही कलाकार आयुष्यभर रसिकांसाठीच काम करतो ज्याच्या नावातच रसिक शब्द आहे अशा रसिक ग्रुपनेच या गुढीपाडवा सांस्कृतिक सोहळ्याचे भव्य आयोजन केल्याचा वेगळा आनंद येथे वाटत आहे. नगरकरांनी कायमच माझ्यावर भरभरून प्रेम केले आहे. त्यामुळे आजच्या मराठी नव्या वर्षाच्या पहिल्याच दिवशी मला नगरकरांचे मुखदर्शन झाल्याने येणारे पूर्ण वर्ष माझे सुखात जाणार आहे. रसिक ग्रुपने रसिककला गौरव पुरस्कार देवून मला सन्मानित



केल्याबद्दल आभार, असे प्रतिपादन प्रसिद्ध गायक अवधूत गुप्ते यांनी केले.


गुढीपाडव्यापासून सुरु होणारे मराठी नव वर्षाचे जल्लोषात स्वागत करण्यासाठी रसिक ग्रुपच्या वतीने आयोजित रसिकोत्सव' या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमात महाराष्ट्राचा आवाज म्हणून ओळखले जाणारे गायक अवधूत गुप्ते यांनी धमाल उडवत लाईव्ह इन कॉन्सर्ट कार्यक्रमाद्वारे रसिक नगरकरांना मंत्रमुग्ध केले. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण ढंगात सादर केलेल्या मराठी गाण्यांवर उपस्थित प्रक्षकांनी गुप्ते यांना अक्षरशः डोक्यावर घेत ताल धरला. यावेळी रसिक ग्रुपच्या वतीने अवधूत गुप्ते यांना रसिक कला गौरव पुरस्कार विशेष पोलीस महासंचालक बी.जी.शेखर पाटील व मनपा आयुक्त डॉ. पंकज जावळे यांच्या हस्ते देवून विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी खा.डॉ.सुजय विखे, सी.जी पॉवर कंपनीचे उपाध्यक्ष इंद्रनील धनेश्वर, कार्यक्रमाचे संयोजक जयंत येलूलकर सर्व प्रायोजक, विविध क्षेत्रतील नागरिक व हजारो रसिक प्रेक्षक उपस्थित होते.

यावेळी अवधूत गुप्ते तूच माझी आई देवा... हे भक्ती गात स्टेजवर इंट्री केली. बाई बाई मन मोराचा..., राणी माझ्या मळ्यामंदी..., अशी अनेक गाजलेली मराठी गाणे सादर करत छत्रपती शिवाजीमहाराजांचे राजं आलं राजं आलं जग जिंकुनी... गाणे सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या पार्श्वगायिका सावनी रवींद्र यांनी मंगळागौर गाणे, पार्श्वगायक कौसुभ गायकवाड याने लग्नाळू व मुग्धा कुऱ्हाडे यांनी प्रेमगीत सादर केले. विशेष पोलीस महासंचालक बी.जी.शेखर येलूलकर म्हणाले, जर शहरावर सर्वांनी प्रेम केल्यास शहर समृद्ध होण्यास वेळ लागणार नाही. उद्याच्या पिढीला चांगले शहर दाखवण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. यासाठी रसिक ग्रुप प्रयत्नशील आहे.

**समाचार**

**वाचकांना नम्र सूचना**

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.



**हनुमान चालिसा**

**मंगल भक्त सेवा मंडळ**

गुरुवार, दि. ११ एप्रिल २०२४
रात्रौ ८.३०
- स्थळ -
**सातपुते तालीम मित्र मंडळ**
सातपुते तालीम, नालेगाव,
**अहमदनगर**

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडल**

गुरुवार, दि. ११ एप्रिल २०२४
रात्रौ ८.३०
- स्थळ -
**पवनजी प्रसादजी शिंगवी**
श्री बसंत बंगला, इंद्रप्रस्थ मंगल कार्यालयच्या मागे, भवानीनगर
अहमदनगर

**श्री दक्षिण मुखी हनुमान सत्संग मंडळ**

गुरुवार, दि. ११ एप्रिल २०२४
रात्रौ ८.३०
- स्थळ -
**मनोज खेडकर (परिवार)**
खेडकर मेडिकल, हॉटेल प्रेमदान मागे, फुलारी पेट्रोल पंपाजवळ, बालिकाश्रम रोड,
मनोज खेडकर

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट)**

गुरुवार, दि. ११ एप्रिल २०२४
रात्रौ ८.३०
- स्थळ -
**स्वराज युवा प्रतिष्ठाण**
सागर कॉम्पलनेक्स, स्विट कॉर्नर चौक, आकरकर मळा

## वाळकीत श्रीराम जन्मोत्सवास प्रारंभ

# कलियुगात राम कथेतील विचार आत्मसात करावे- कदम महाराज

**समाचार/नगर-दि.११**

जीवनातील असंख्य व्यथा रामकथा श्रवण केल्याने दुर होतात . मानवाने जीवनात संधी मिळण्याची प्रतिक्षा करण्यापेक्षा मिळालेल्या संधीचे सोने करत आपले जीवन सुखकर अन् समाधानी बनवावे . रामायण कथेतून बंधु प्रेम , पत्नी प्रेम , माता पित्यांची आज्ञा , सत्यवचन याची शिकवण आपणास मिळते . रामकथा श्रवणाने मनशांती , समाधान मिळते . त्यामुळे कलियुगात रामायण कथेतील विचार आत्मसात करण्याची गरज असल्याचा उपदेष रामायणाचार्य नाना महाराज कदम यांनी दिला .



नगर तालुक्यातील वाळकी येथे श्रीराम जन्मोत्सव सोहळ्यास तुलशी रामायण कथेने मोठ्या थाटात प्रारंभ करण्यात आला . रामकथा सात दिवस चालणार असून श्रीरामांच्या जीवनातील प्रसंग संगितमय कथेतून आपल्या रसाळ अमृतमय वाणीतून रामायणाचार्य नाना महाराज कदम उपस्थित श्रोत्यांसमोर उलगडणार आहेत . कथेतील पहिले पुष्प गुंफतांना रामकथा आत्मसात करण्याचा उपदेष त्यांनी उपस्थित श्रोत्यांना दिला .वाळकीकरांचे दैवत समाधिस्त महेंद्रनाथजी महाराज यांच्या अर्धांगिणी गुरुमाता सुभद्रा काकू यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करत रामकथेस प्रारंभ करण्यात आला . यावेळी महेंद्रनाथजींचे शिष्य , नाथभक्त उपस्थित होते . श्रीराम जन्म सोहळ्यासाठी नाथसेवाच्या स्वयंसेवकांनी परिसरात स्वच्छा , सुशोभिकरण , विद्युत रोषणाई केली असून गेल्या महिनाभरापासून कार्यक्रमाच्या तयारीसाठी परिश्रम घेतले . दि . १० ते १६ पर्यंत तुलशी रामायण कथा चालणार आहे. दि. १७ रोजी श्रीराम मंदिरात सकाळी महाअभिषेक, होमहवन, ९ ते १२ राम जन्मानिमित्त हभप नाना महाराज कदम यांचे काल्याचे किर्तन होणार आहे . दुपारी १२ वाजता हजारो भाविकांच्या उपस्थितीत श्रीराम जन्म सोहळा साजरा होणार आहे. दुपारी महाप्रसाद, सायंकाळी श्रीराम प्रतिमेची रथातून मिरवणूक आणि रात्री शोभेच्या दारुकामाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे.परिसरातील भाविकांनी या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन नाथसेवा

# भाजपा ओबीसी मोर्चातर्फे महात्मा फुले यांना अभिवादन



**समाचार/नेवासा-दि.११**

थोर समाजसेवक महात्मा फुले यांनी दीनदुबळ्या वंचित घटकांसाठी शिक्षणाचे कार्य केले. तसेच समाजातील दरी कमी करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. विधवा विवाहास मान्यता दिली. अशा या थोर समाजसुधारक क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना भारतरत्न पुरस्कार द्यावा असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे ओबीसी शहर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यांनी केली.

माळीवाडा येथे थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त माळीवाडा येथे थोर समाजसेवक क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपा ओबीसी मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ होते. तर प्रमुख उपस्थितीत भाजपा जेष्ठ नेते वसंत लोढा, सरचिटणीस सचिन पारखी, प्रशांत मुथ्था, पंडित वाघमारे, बाबासाहेब सानप,किशोर डागवाले, संजय ढोणे, महेश तवले, प्रिया जानवे,ज्योती दांडगे, गोपाल वर्मा, बाळासाहेब गायकवाड, करण डापसे, अनिल निकम बाळासाहेब खताडे, शरद मुरतडकर, सुनील भिंगारे, सुनील सकट, दत्ता गाडळकर, अमोल निस्ताने, रेखा विधाते, सोमनाथ चिंतामणी, दिपक देहेरेकर, अ‍ॅड. चंदन बारटक्के, अ‍ॅड.राहुल रासकर, विजय वाडेकर, सतिश रासने, शरद कोंडा, अमित करे, लवेश गोंधळे आदींसह ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साडेसात तास चालले मदतकार्य

**समाचार/नेवासा-दि.११**

वाकडी (ता.नेवासा) येथील दुर्घटनेनंतर सायंकाळी सात वाजता सुरू झालेले मदतकार्य सर्व मृतदेह सापडल्यानंतर रात्री दीड वाजता थांबले. तब्बल साडेसात तास ही शोधमोहीम सुरु होती. शेणमातीतून भरलेल्या विहिरीतून मृतदेह बाहेर काढण्यास सर्व यंत्रणा हतबल ठरल्यानंतर अखेर पोकलेन पाचरण करण्यात आले. त्यानंतर टप्प्याटप्प्याने चारही मृतदेह विहिरीतील गाळातून बाहेर काढण्यात आले. विशाल अनिल काळे यांचा मृतदेह आधीच गळ टाकून पलंगावर काढला होता. बुधवारी सकाळी १० वाजता सर्व मृतांवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

मंगळवारी रात्री विहिरीतील गाळ काढण्यासाठी ज्ञानेश्वर कारखान्याचे अग्निशमन दल बोलावले होते. परंतु त्यातही अडचणी आल्यानंतर मृतदेह काढण्यासाठी खरवंडी येथे सुरु असलेल्या एका कामावरून पोकलेन पाचारण करण्यात आले. ते रात्री साडेअकरा वाजता वाकडीत आले. त्यानंतर शोधकार्याला वेग आला. पोकलेनने पहिला मृतदेह माणिक काळे यांचा रात्री ११.४० मिनिटांनी तर बाबासाहेब पवार यांचा मृतदेह रात्री १२ वाजता, त्यानंतर साडेबाराला संदीप काळे, तर एक वाजता शेवटचा मृतदेह अनिल काळे यांचा बाहेर काढला. नेवासे फाट्यावरील ग्रामीण रुग्णालयात मृतदेहांची उत्तरिय तपासणी करण्यात आली. त्यानंतर बुधवारी सकाळी सर्वांवर अत्यंसंस्कार झाले. मंगळवारी रात्री साडेआठ वाजता जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, पोलीस अधीक्षक राकेश ओला घटनास्थळी आले. ते रात्री दीड वाजेपर्यंत येथेच ठाण मांडून होते.

# बाराशे अधिकारी-कर्मचाऱ्यांना शिर्डीत दिले निवडणूक प्रशिक्षण

**समाचार/नगर-दि.११**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या कामकाजासाठी नियुक्त केलेल्या प्रत्येक अधिकारी, कर्मचाऱ्यांनी निवडणूक प्रक्रियेचे महत्त्व लक्षात घेवून विहित पद्धतीने कर्तव्य पूर्ण करावेत. निवडणूक प्रक्रिया बिनचूक पार पाडावी, अशा सूचना शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी दिल्या.

शिर्डी विधानसभा मतदार संघाच्या वतीने राहाता येथील कुंदन लॉन्स येथे आयोजित निवडणूक कर्मचाऱ्यांच पहिल्या प्रशिक्षण सत्राच्या प्रथम सत्राच्या भेटीप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा शिर्डी प्रांताधिकारी माणिक आहेर, अतिरिक्त सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा राहाता तहसीलदार अमोल मोरे, गटविकास अधिकारी जालिंदर पठारे, शिर्डी नगरपालिकेचे मुख्याधिकारी सतीश दिघे आदी उपस्थित होते.

अपर जिल्हाधिकारी कोळेकर म्हणाले, सर्वसमावेशक आणि सर्वांना सोयीची होईल अशी निवडणूक घेण्यासाठी जिल्ह्याची तयारी पूर्ण झाली आहे. मतदान हा त्यातील महत्त्वाचा भाग आहे. निवडणूक कर्तव्यासाठी नेमलेल्या अधिकाऱ्यांनी कायदेशीर प्रक्रिया, माहिती पुस्तिका याचे अवलोकन करून कामकाज पहावे. मतदान प्रक्रिया राबविताना काही अडचणी असल्यास वरिष्ठांचे वेळोवेळी मार्गदर्शन घ्यावे, असे सांगितले.

# शेकडो अनाथ मुलांना घर देणारी संवेदनशील संस्था

## लोकसेवार्थ

बदलत चाललेली जीवनशैली, आटत चाललेला माणुसकीचा झरा आणि आप मतलबी जगातही आपल्या सामाजिक जाणीवा जिवंत ठेऊन वाटचाल करणारे काही लोक आपल्या आजूबाजूला वावरत असतात. त्यापैकीच एक आहेत भारतीय समाज सेवा केंद्राच्या संचालिका सुनीताताई तगारे. निराधार चिमुकल्याना हक्काचे घर मिळवून देण्याचं महान कार्य या संस्थेच्या माध्यमातून तगारे ताई करतात. गोड हसणारी, गोंडस दिसणारी, प्रसंगी दुडूदुडू धावणाऱ्या या चिमुकल्यांना मोठ्या आपुलकीने त्या आणि त्यांच्या संस्थेतील सगळे कर्मचारी माया लावतात. योग्य कुटुंब शोधून त्यांना हक्काचे आई बाबा मिळवून देतात. गेल्या १५ वर्षात या संस्थेने सुमारे ८६२ मुलामुलींना दत्तक देण्याचे फार मोठे काम केले आहे. पुण्यामधील सिडको एन २ भागातील अनिकेतन या वास्तूत सुनीताताई तगारे आणि त्यांच्या सहकार्यांनी स्वीकारलेले समाजसेवेचे व्रत अखंडितपणे सुरु आहे.



भारतीय समाज सेवा केंद्राची स्थापना १९७९ यामध्ये पुण्यात झाली. १९९५ मध्ये या संस्थेची औरंगाबाद मध्ये देखील शाखा सुरु झाली. तेव्हापासून सुनीता तगारे या संचालिका म्हणून काम पाहत आहेत. संस्थेचे विविध क्षेत्रात काम चालते. यात प्रामुख्याने निराधार मुलांचा स्वीकार आणि संगोपन, हे काम अग्रक्रमावर आहे. अनेकदा अैनतिक संबंधामुळे नकोशी असणारी मुले जन्मदात्या माताच रस्त्यात सोडून देतात. अशा मुलांना ही संस्था जवळ करते. त्यांना प्रेम लावणारे आई बाबा मिळवून देते. काही मूल लहानपणीच पालकांचे छत्र गमावतात बऱ्याचदा रेल्वे किंवा एसटीस्टँड्वर मुले हरवतात. पोलिसांमार्फत ही मुले मग या संस्थेपर्यंत पोहोचतात. अशा पाच वर्षाखालील अनाथ मुलांचे संगोपन करण्याचे काम ही संस्था करते. अशी बालक दत्तक जाईपर्यंत भारतीय सामाजिक संस्थेमार्फत सांभाळली जातात. दरवर्षी साधारणपणे ६० ते ६५ मुले या केंद्रात दाखल होतात. दाखल झालेल्या मुलांना वेळीच योग्य कुटुंब लाभले तर त्यांचे संगोपन व्यवस्थित होते. सध्या या संस्थेत २९ मुले मुली दाखल आहेत. या मुलांना दत्तक घेण्यासाठी शेकडो कुटुंबांनी नोंदणी केली आहे.

शहरी भागात कुमारी मातांचा प्रश्न गंभीर आहे. अभ्यास केला असता असे निदर्शनास आली की, बऱ्याच प्रकरणात या मुली वयाने लहान असतात. अशा १३ वर्षावरील मुलींसाठी भारतीय सामाजिक संस्थेच्यावतीने पालवी नावाचा प्रकल्प सुरु करण्यात आलेला आहे. या प्रकल्पांतर्गत मुलींना शरीरशास्त्राविषयी माहिती देणे, पालक आणि मुलगी यांच्यात सुसंवाद निर्माण करणे असे कार्यक्रम आयोजित केले जातात. आतापर्यंत १२०० हून अधिक मुलींनी अशा कार्यक्रमांना हजेरी लावलेली आहे . संस्थेच्या माध्यमातूनच अशा मुलींना रोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्न देखील केले जातात. या मुलींना आत्मनिर्भर बनवून स्वतःच्या पायावर उभे करून समाजात त्यांना योग्य ते मनाचे स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न संस्था करते. एकूणच, अनेक अनाथांना हक्काचे घर आणि मायेचे आईबाबा मिळवून देणारी भारतीय सामाजिक संस्था एक आदर्श सामाजिक संस्था म्हणता येईल. अशा सामाजिक संस्थांना समाजातील दानशूरांनी आपला खारीचा वाटा उचलून आपल्या परीने आर्थिक मदत नक्कीच करायला हवी.

# 'मातोश्री वृद्धाश्रम' योजना

## योजना जनकल्याणी

'वृद्धाश्रम' योजनेबरोबरच ज्येष्ठ नागरिकांना वृद्धाश्रमामध्ये काही अधिकच्या सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात, (उदा. बाग-बगीचा, वाचनालय, दूरदर्शनवरील कार्यक्रम पाहण्यासाठी सुविधा, बैठे खेळ इत्यादी) म्हणून सर्व सोयींनी युक्त असे

मातोश्री 'वृद्धाश्रम' ही योजना शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने शासन १७ नोव्हेंबर, १९९५ रोजी स्वयंसेवी संस्थांमार्फत

# शब्दखेळ - १४७

खाली दिलेल्या चौकोनात सुप्रसिद्ध लेखक विश्वास पाटील यांच्या १० कादंबऱ्यांची नाव लपलेली आहेत. शोधा पाहू.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पा | चं | द्र | मु | खी | श | हा | सं |
| नि | झा | ळ | गां | व | ना | प | भा |
| प | डा | बु | धी | या | ग | र | जी |
| त | झ | ल | गी | र | के | भ | र |
| ढे | ड | ढा | ता | पु | श | णी | क्रां |
| पां | ती | णा | डे | ग | र | पु | ती |
| गि | क | ला | ल | चौ | क | र | सू |
| रा | म | हा | ना | य | क | री | र्य |

## शब्दखेळ - १४६ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पा | कृ | शे | फ | ल | र | का | मों |
| र्क | पे | री | का | र्डी | न | स्म | ट |
| र | यु | ढ | क्रो | त्र | पे | म | ब्लॅ |
| म्है | नी | स | स | गी | ली | गा | क |
| स | बॉ | सा | पा | पा | क | ह | ट |
| ल | ल | रा | फ | प | न | री | दु |
| मे | क | पा | य | ल | ट | ण | धु |
| ळी | वो | ट | र | मे | न | दा | म |

# मराठी साहित्यातील अजरामर कवयित्री बहिणाबाई चौधरी

विसाव्या शतकाच्या आरंभीची मराठी कविता अभ्यासतांना आपल्याला बहिणाबाई चौधरी या कवयित्रीला विसरून चालणार नाही. आधुनिक मराठी कवितेच्या प्रांतातील बहुतेक सर्वच कवी विद्वान, व्यासंगी होते. पण बहिणाबाई चौधरी या अशिक्षित होत्या. तरीही त्यांनी रचलेले काव्य वाचल्यावर एखादा जाणता, शिकलेला आणि चार ठिकाणी फिरून अनुभव घेतलेला कवी असावा असं वाटतं. बहिणाबाई चौधरी यांचा जन्म महाराष्ट्रातील असोडे (जळगाव) गावात झाला. हे गाव खान्देशातील जळगावपासून ६ किमी अंतरावर आहे. त्यांच्या आईचे नाव भीमाई होते. त्यांना घमा, घाना आणि गण नावाचे तीन भाऊ आणि अहिल्या, सीता, तुलसा नावाच्या तीन बहिणी होत्या. बहिणाबाईंचा वयाच्या १३ व्या वर्षी (१८९३) खंडेराव चौधरीचा मुलगा नथुजींबरोबर विवाह झाला. त्यांना ओंकार, सोपानदेव नावाची दोन मुले आणि काशी नावाची मुलगी होती. त्यांनी गायलेल्या कविता शेजाऱ्यांनी लिहिल्या आणि काही कविता नष्टही झाल्या. त्या अशिक्षित होत्या, पण त्यांच्याकडे काव्यात्मक जीवनाची प्रतिभा होती. हे सर्व ऐकून त्यांचा मुलगा सोपानदेव आणि त्यांचा चुलत भाऊ दोघेही जमेल तसे लिहायचे. महाराष्ट्रातील कवी सोपानदेव बहिणाबाईंचा मुलगा होता. बहिणाबाईंच्या




मृत्यूनंतर सोपानदेव आणि त्यांचे चुलत भाऊ पितांबर चौधरी या दोघांकडे बहिणाबाईंची गाणी हस्तलिखित स्वरूपात होती. सोपानदेवाने या कविता आपल्या गुरु आचार्यांना दाखवल्या, गुरु म्हणाले की हे सोने आहे! महाराष्ट्रापासून ते लपवणे हा गुन्हा आहे आणि त्या कविता प्रकाशित करण्याचे वचन दिले. बहिणाबाईंच्या कविता विशेषतः त्यांच्या मातृभाषेवर अवलंबून आहेत, त्यांच्या कवितांचा विषय आहे निसर्ग, जग, शेतीविषयक साहित्य इत्यादी तसेच कृषी जीवनातील विविध घटना, पोळा, गुढीपाडवा इत्यादी सणांचा समावेश आहे. सूर्य, वारा, पाणी, आकाश, भगवान श्रीकृष्ण त्यांच्या कवितांमध्ये आढळतात.

**मन वढाय वढाय उभ्या पिकातलं ढोर,**
**किती हाकला हाकला फिरी येते पिकावर.**

पृथ्वीवरचा सर्वांत हुशार आणि बुद्धिमान प्राणी मानव आहे. त्याला बोलता येते, वाचता येते आणि विचारही करता येतो. इतके असूनही अनेकजण आपल्या जबाबदाऱ्यांपासून दूर पळतांना आपल्याला दिसतात. एका सुगरण पक्ष्याचे उदाहरण घेऊन किती सुंदर विचार बहिणाबाई मांडतात.

**अरे खोप्या मंधी खोपा सुगरणीचा चांगला,**
**देखा पिलासाठी तिनं झोका झाडाले टांगला.**
**तिची उलूशीच चोचं, तेच दात तेच ओठ,**
**तुले देले रे देवाने, दोन हात दहा बोटं.**

बहिणाबाईंच्या रचना या खान्देशातील लेवा गणबोलीतील आहेत. बोलीभाषेत त्या रचना असल्यामुळे त्यात गावरान गोडवा आणि आपलेपणा आपसूकच जाणवतो. शेतात पेरणी झाल्यानंतर बियाणं जमिनीत निजण्याची आणि मातीची शाल पांघरल्याची कल्पना बहिणाबाईंनी किती सुंदररित्या मांडली. बहिणाबाईंच्या काव्याच्या निमित्ताने जळगाव-धुळे जिल्ह्यातील अहिराणी बोली प्रकाशात येते. अहिराणीच्या बोलीभाषेचे स्वरूप या काव्यातून समजते. मराठी साहित्यात ज्या मोजक्या स्त्री साहित्यिकांनी दर्जेदार साहित्यनिर्मिती केली आहे, त्यापैकीच एक असणाऱ्या बहिणाबाई चौधरी. पण अशिक्षित असूनही जे साहित्य त्यांनी निर्माण केले त्याला खरोखरच तोड नाही आणि हे जाणून घेण्याकरता तरी एकदा का होईना बहिणाबाईंच्या काव्याचा आस्वाद घेतला पाहिजे.

**अक्षरधारा**




**संकलन-संयोजन**
**सुबोध रणशेवरे**
subodh.ranshevre rediffmail.com

# एमबीएच्या विद्यार्थ्यांची अदानी वीज निर्मिती केंद्राला भेट

**समाचार/नगर-दि.११**

हिवाळे शिक्षण संस्थेची आयएमएस ही व्यवस्थापन संस्था गेल्या तीन दशकाहून अधिक काळापासून व्यवस्थापनाचे शिक्षण देत आहे. विद्यार्थांना आवश्यक असणारे ज्ञान हे फक्त पुस्तकातून न देता प्रात्यक्षिकातून देण्याचा प्रयत्न या ठिकाणी सातत्याने केला जातो. असाच एक उपक्रम संस्थेच्या वतीने राबविण्यात आला. यात डहाणू येथील अदानी वीज निर्मिती केंद्रास एमबीएच्या विद्यार्थ्यांची औद्योगिक भेट आयोजित करण्यात आली होती. या अंतर्गत विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रातील व्यवस्थेचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी प्राप्त झाली. डहाणू येथील वीज निर्मिती केंद्राला भेट देऊन येथील इतक्या मोठ्या प्रमाणावर काम करत असलेले कामगार त्यांचे व्यवस्थापन, पर्यावरणासाठी केलेले काम, कामगार कायदे, त्याची गरज, वीज निर्मितीची




एकूण प्रक्रिया, कामगारांसाठीच्या सोयी सुविधा, त्याचबरोबर कामगारांचे प्रश्न सोडविताना घ्यावयाची काळजी, मानव संसाधन या सर्व गोष्टीचा अभ्यास या भेटीत करण्यात आला.

वीज हि जीवनातील आवश्यक बाब आहे पण एक युनिट वीज निर्मितीसाठी येणारा खर्च पाहता वीज वाचवणे किती महत्वाचे आहे हा सामाजिक संदेश देखील या भेटीत मुलांना समजला. अशा भेटी मुलांच्या दृष्टीने खूप महत्वाच्या असतात त्यातून त्यांना अशा भेटींचे नियोजन देखील विद्यार्थीच करतात त्यामुळे यातून व्यवस्थापनाचा धडा शिकायला मिळतो.

संस्थेचे संचालक डॉ एम बी मेहता, उपसंचालक डॉ विक्रम बार्नबस, अभ्यासक्रमाच्या समन्वयक डॉ प्रोनोती तेलोरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. विजय शिंदे यांनी या भेटीचे नियोजन केले. अदानी वीज निर्मिती केंद्राचे समन्वयक कल्पित राउत यांनी मुलांना सर्व वीज निर्मितीची प्रक्रिया समजावून सांगितली व सर्व वीज केंद्र फिरून दाखवले. कृष्णा शेंडे, अंकुर धानवे, कर्ण नामदे, गौरव पवार या विद्यार्थ्यांनी भेटीचे व्यवस्थापन सांभाळले.



# फुलेंच्या क्रांतीकारी विचारातून देशाची प्रगती - आयुक्त

**समाचार/नगर-दि.११**

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या क्रांतिकारी विचाराच्या माध्यमातून देशाची प्रगती झाली असून सामाजिक एकोपा, प्रेम निर्माण होऊन प्रगल्भ राष्ट्र निर्माण झाले आहे. महिला शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून मुलींना खऱ्या अर्थाने शिक्षणाची दारे खुली करून दिली असल्यामुळे आपल्या देशाने विविध क्षेत्रांमध्ये क्रांती घडवली आहे असे प्रतिपादन आयुक्त डॉ. पंकज जावळे यांनी केले.

मनपाच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आ. संग्राम जगताप, माजी उपमहापौर गणेश भोसले, प्रा. माणिकराव विधाते, सुरेश खरपुडे, ज्ञानेश्वर रासकर, जल अभियंता परिमल निकम, आस्थापना विभाग प्रमुख मेहेर लहारे, आनंद पुंड, बंडू इवळे आदी उपस्थित होते. महापालिकेच्या माध्यमातून मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले यात नागरिकांनी तपासणी करून घेत मनपाच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

## सकल जैन समाजाची धार्मिक परीक्षा बोर्ड येथे बैठक

# भगवान महावीर जयंती मिरवणुकीत शिस्त पाळावी- आदर्शऋषी महाराज

**समाचार/नगर-दि.११**

भगवान महावीर यांनी जगाला अहिंसा आणि शांतीचा संदेश दिला. दया, करुणा, वात्सल्याची शिकवण त्यांनी दिली. समस्त प्राणीमात्रांचे कल्याण त्यांना अभिप्रेत होते. त्यामुळे भगवान महावीर यांची जयंती उत्साहात साजरी करताना सकल जैन समाजाने मिरवणुकीत शिस्त पाळावी. मिरवणूक मार्गावर सरबत, थंड पेये, बिस्किटे वाटल्याने मिरवणूक विस्कळीत होते. प्लास्टिकचे ग्लास, रिकामे पाऊच रस्त्यावर फेकले जातात. त्यामुळे कचरा होतो, घाण होते. या सर्व गोष्टी टाळाव्यात आणि प्रसाद वाटप मिरवणुकीच्या शेवटी आनंदधाम परिसरातच करावा. सर्वांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून जास्तीत जास्त संख्येने मिरवणुकीत सहभागी व्हावे, असे आवाहन प्रबुद्ध विचारक आदर्शऋषी महाराज यांनी केले.

भगवान महावीर जयंतीनिमित्त (जन्मकल्याणक) दि. २१ एप्रिल



रोजी नगरमध्ये सकल जैन समाजाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे विविध कार्यक्रम तसेच भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. या मिरवणुकीच्या नियोजनासंदर्भात धार्मिक परीक्षा बोर्ड येथे बैठक घेण्यात आली.

यावेळी महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषी महाराज, प्रबुद्ध विचारक आदर्शऋषी महाराज, आलोकऋषी महाराज आदी साधू-साध्वी तसेच जैन मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा, भाजपाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य वसंत लोढा, दिगंबर जैन समाजाचे महावीर बडजाते, नरेंद्र लहाडे, मदनलाल कोठारी, सचिन डुंगरवाल, अजय गंगवाल आदी पदाधिकारी उपस्थित होते.भगवान महावीर जयंती मिरवणूक मार्गावरील स्वच्छता, भाविकांचा सहभाग अशा विविध विषयांवर उपस्थित प्रतिनिधींनी विविध सूचना केल्या. कुंदनऋषी महाराज, आदर्शऋषी महाराज यांनी भगवान महावीर यांची शिकवण सांगून मिरवणुकीबाबत मौल्यवान सूचना व मार्गदर्शन केले.

तसेच भगवान महावीर जयंतीदिनी मिरवणूक, धार्मिक बोर्डावरील प्रवचन, गौतम प्रसादी असे सगळे कार्यक्रम होईपर्यंत दुपारी १ वाजेपर्यंत सर्वांनी आपली दुकाने, व्यवहार बंद ठेवून कार्यक्रमात आवर्जून सहभाग नोंदवत सकल जैन समाजाने एकजूट दाखवून द्यावी, तसेच सायंकाळी ७ वाजता आनंदधाम येथे आयोजित भक्ती संध्या कार्यक्रमालाही सर्वांनी आवर्जून उपस्थित रहावे, असे आवाहन आदर्शऋषी महाराज यांनी यावेळी केले.

## विशाल गणेश मंदिर देवस्थानतर्फे अभिवादन

# महात्मा फुलेंमुळे सत्यधर्माची पहाट उगवली - ॲड. आगरकर

**समाचार/नगर-दि.११**

महात्मा फुले यांनी अज्ञानाच्या अंधकारात खितपत पडलेल्या आणि अठरा विश्वे दारिद्र्य उराशी असणार्याक चक्रव्ह्युहात सापडलेल्या समाजाचा उद्धार केला. हजारो वर्ष बहुजन समाज गुलामगिरीच्या गर्ते त बुडालेला होता. जात-पात भेद मोठ्या प्रमाणावर वाढले होते, भारतीय समाज तेजोहीन झालेला होता. सर्वत्र सामाजिक गुलामगिरीचा अंधकार दाटलेल्या, गुलामीची जाणीव कोणालाच होत नव्हती, समाज अनिष्ट रूढी परंपरेत बुडालेला होता. अशावेळी महात्मा ज्योतीबा फुले यांच्या रुपाने समाजाला एक आशेचा किरण दिसला. आणि त्यांच्या तजोमय विचाराने सार्वजनिक



सत्यधर्माची पहाट उगवली, असे प्रतिपादन श्री विशाल गणेश मंदिर देवस्थानचे अध्यक्ष ॲवड.अभय आगरकर यांनी केले.क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांच्या जयंतीनिमित्त शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरच्यावतीने माळीवाडा येथील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महंत संगमनाथ महाराज,उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, पांडूरंग नन्नवरे, रंगनाथ फुलसौंदर, बापूसाहेब एकाडे, चंद्रकांत फुलारी, ज्ञानेश्वर रासकर, विजय कोथिंबीरे, गजानन ससाणे, प्रा.माणिकराव विधाते, नितीन पुंड, राजेंद्र एकाडे, गणेश राऊत, नामदे आदि उपस्थित होते. खरपुडे म्हणाले, सत्यशोधक समाजाची स्थापना करणारे आणि आपले संपूर्ण आयुष्य समाजासाठी वेचणार्यात जोतिबा फुले यांना जनतेने महात्मा' पदवी बहाल केली. त्यांचे विचार आणि कार्य सर्वांसाठी नेहमीच प्रेरणादायी राहील.

## समता परिषदेतर्फे फुले जयंती साजरी

**समाचार/नगर-दि.११**

महात्मा फुले समता परिषद त्यांचे विचार समाजापर्यंत पोहचविण्याचे काम कृतीतून करत आहे. समाजात जागृती निर्माण करण्याचे काम महात्मा फुले यांचे साहित्य करेल, असा विश्वास समता परिषदेचे महानगर अध्यक्ष दत्ता जाधव यांनी केले.



# दादा चौधरी शाळेत सदिच्छा समारंभ

**समाचार/नगर-दि.११**

शाळेत विद्यार्थ्यांना अत्याधुनिक संगणक कक्ष, टोईज बँक,तसेच क्रीडा साहित्य,स्पर्धा परीक्षा तयारी अशा विविध सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत, असे प्रतिपादन दादा चौधरी मराठी शाळेचे अध्यक्ष सुमतीलाल कोठारी यांनी केले.

हिंद सेवा मंडळाच्या दादा चौधरी मराठी शाळेत इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचा सदिच्छा समारंभ उत्साहात संपन्न झाला. चौथीच्या विद्यार्थ्यांनी शाळेला टेबल क्लाथ भेट दिले.४ थीच्या विद्यार्थ्यांनी इंग्रजीतून मनोगत व्यक्त केले. शाळेची विदयार्थीनी बाल किर्तनकार ह.भ.प.कु. कृष्णाई महाराज हिने संतविचार सादर केले.पालक ह. भ.प . शिंदेताई महाराज यांनी बहिणाबाईंची कविता गायन करून शाळेचे कौतुक करून मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी हिंद सेवा मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा,भाई सथ्था नाईट हायस्कूलचे अध्यक्ष डॉ.पारस कोठारी, दादा चौधरी मराठी शाळेचे अध्यक्ष सुमतीलाल कोठारी, दादा चौधरी विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक संजय मुदगल,नगर शहरातील अंगणवाडी प्रमुख सुरेखा नवले,सविता चिल्वर,श्यामल व आडाप, पा.ड. क.वि. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका रोहिणी फळे,दादा चौधरी मराठी शाळेचे मुख्याध्यापक सुभाष येवले,ज्येष्ठ शिक्षक दिलीप परसपाटकी, धर्माधिकारी सर,वर्षा गुंडू, जयसुधा ताटी,घोडे उपस्थित होते.

# राज ठाकरेंमुळे महायुतीला बळकटी मिळेल- खा. विखे

**समाचार/नगर-दि.११**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महायुतीला पाठिंबा दिला आहे. राज ठाकरे यांच्यामुळे राज्यातील महायुती अधिक बळकट होईल, असे प्रतिपादन खा. सुजय विखे यांनी केले.

राज ठाकरे यांनी मुंबईतील सभेत महायुतीला पाठिंबा देत असल्याची घोषणा केली. याबाबत खा. विखे नगरमध्ये पत्रकारांशी बोलत होते. ते म्हणाले की, राज ठाकरे यांनी सभेत काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष लागले



होते. त्यांनी पंतप्रधान मोदींना पाठिंबा दिला आहे. त्यामुळे महायुतीत मनसेचा समावेश झाला आहे. राज ठाकरेंच्या या निर्णयामुळे महविकास आघाडीच्या चिंता नक्कीच वाढल्या असतील. राज ठाकरे यांचे तरुणांना आकर्षण आहे. तसेच मराठी माणसांचा राज ठाकरे यांच्यावर विश्वास आहे.

त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील मनसेचे कार्यकर्ते महायुतीला मदत करतील. त्याचा मोठा फायदा महायुतीच्या उमेदवारांना होईल, असे खा. विखे यांनी सांगितले. देशात फक्त नरेंद्र मोदी यांची गॅरेंटी सुरू आहे. यावेळी भाजपा ४०० पारचे उद्दिष्ट सहज गाठेल, इंडिया आघाडीची हवा मिटत चालली आहे, असे खा. विखे म्हणाले.

# विश्व हिंदू परिषदेतर्फे महात्मा फुले यांना अभिवादन

**समाचार/नगर-दि.११**

ज्योतिबा फुले यांनी समाजातील मागासलेल्या घटकांना आणि दलितांना न्याय मिळवून देण्यासाठी सत्यशोधक समाज स्थापन केला.त्यांच्या समाजसेवेने प्रभावित होऊन १८८८ मध्ये मुंबईत झालेल्या एका सभेत त्यांना 'महात्मा ही पदवी बहाल करण्यात आली. फुलेंनी विधवा विवाहाचं समर्थन केले.थोरसमाज सुधारक महात्मा फुले यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात यावे, अशी मागणी नगर जिल्हा विश्व हिंदू परिषदेच्या वतीने भारत सरकारला करण्यात येत आहे, असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेचे पश्चिम महाराष्ट्रचे



प्रांत प्रिंट मीडिया प्रमुख अमोल भांबरकर यांनी केले.

माळीवाडा येथील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याच्या अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा मंत्री अनिल जोशी, जिल्हा सहमंत्री शरद नगरकर, विभाग मंत्री सुनील खिस्ती, विभागीय अधिकारी गजेंद्र सोनवणे बजरंग दलाचे जिल्हा संयोजक कुणाल भंडारी, शिवराज पवार, विश्वास बेरड, विरेंद्र शिंदे,साहिल पवार, कुणाल खंडेलवाल, बाबासाहेब साठे, सचिन पळशीकर, राजेंद्र चुंबळकर, किशोर शिंदे, मनोज ठाकुर आदी उपस्थित होते.

# चैत्र शोभायात्रेस नगरकरांचा प्रतिसाद

**समाचार/नगर-दि.११**

गुढीपाडवा म्हणजे मराठी नवीन वर्षाची सुरुवात सलग तिसऱ्या वर्षी नगरकरांनी चैत्र शोभायात्रेमध्ये उस्फूर्त सहभाग घेत आपल्या वारी परंपरेबद्दल अभिमान बाळगत वारकऱ्यांच्या या शोभायात्रेत उत्स्फुर्त सहभाग घेतला. पहाटे सहा वाजता सर्व नगरकर प्रोफेसर कॉलनी चौकात जमले. गणांत प्रतिष्ठानच्या ढोल पथकाने या चैत्र शोभा यात्रेची सुरुवात झाली. पुढे गुलमोहर रोड मार्गे एकविरा चौका जवळ सांदिपनी ॲकॅडमीच्या परिसरात या चैत्र शोभा यात्रेची सांगता झाली. या कार्यक्रमात गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रामाष्टक आणि विठ्ठलाच्या नाम गजरात नृत्य सादर केलं. तसेच एम.एम.वाय.टी.सी. यांनी योगा आणि मल्लखांब प्रात्यक्षिके केली केली. यावर्षी 'संतसृष्टी' ही थीम घेऊन ही चैत्र शोभायात्रा नगरकरांनी यशस्वी केली.




नगर मधील अनेक संस्थांनी स्वयंस्फूर्तीने या शोभायात्रेत सहभाग नोंदवला. यात इम्प्रेस बायकर्स, भारत भारती, चौपाटी कारंजा मित्र मंडळ, वृद्धेश्वर अर्बन, दत्त योगीराज आश्रम मुळेवाडी, बालरंग भूमी परिषद, अहमदनगर, इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया अहमदनगर ब्रांच, स्नायडर इलेक्ट्रिक, झुलेलाल ग्रुप, श्रावणसखी, मोरया मॉर्निंग क्लब, स्वानंदी हास्य क्लब , एस जे के ब्युटी अॅकॅडमी, नगर जल्लोष, संस्कार भारती, तुकाराम व्हॅन, ट्रेक कॅम्प, आर्ट ऑफ लिव्हींग, विधी सेवा,प्राधिकरण,निमा, मैत्री कट्टा, मेहेरबाबा सेंटर, अनाम प्रेम, राजमुद्रा कॅडमी, सर्व रोटरी क्लब, अहमदनगर, सायकलिस्ट असोसिएशन, राजस्व हॉर्स रायडिंग क्लब सहभागी झाले होते. या कार्यक्रमात रेडिओ सिटी च्या टीम सोबत वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेटचे अजय गावडे, मेघना वाडगे-गावडे, आर के इंटिरियर चे डॉ नितीन कुंकूलोळ , सांदिपनी अॅकॅडमीचे डॉ.के.बालराजू उपस्थित होते.

या चैत्र शोभायात्रेत स्नायडर इलेक्ट्रिक चे अरविंद पारगावकर, चित्रकार तथा शिल्पकार प्रमोद कांबळे, डॉ.प्रकाश कांकरिया डॉक्टर सुधा कांकरिया यांसोबत बरेच मान्यवर सहभागी झाले होते.

आंतरराष्ट्रीय दर्जाचे चष्मे व गॉगल्स अल्पदरात उपलब्ध

# आनंदऋषीजी नेत्रालय विभागात व्हिजीओ क्राफ्ट दालनाचा शुभारंभ





**समाचार/नगर-दि.११**

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या नेत्रालय विभागात नेत्र रुग्णांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे चष्मे व गॉगल्स अल्पदरात उपलब्ध करुन देण्यासाठी गुढी पाडव्याच्या मुहुर्तावर व्हिजीओ क्राफ्ट या दालनाचा शुभारंभ उद्योजक पेमराज बोथरा यांच्या हस्ते झाला. या दालनाच्या माध्यमातून नेत्र रुग्णांना अल्पदरात उच्च दर्जाचे चष्मे व गॉगल्स मिळणार असून, हे दालन ट्रस्टच्या माध्यमातून चालविण्यात येत आहे. यातून मिळणारे उत्पन्न हॉस्पिटल मधील गरजू रुग्णांच्या उपचारासाठी वापरले जाणार आहे.

नेत्रतज्ञ डॉ. प्रकाश कांकरिया व डॉ. सुधा कांकरिया यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी उद्योजक संतोष बोथरा, कुंदन कांकरिया, माणकचंद कटारिया, सतीश लोढा, प्रकाश छल्लाणी, प्रशासकीय अधिकारी आनंद छाजेड, डॉ. संदीप राणे आदी उपस्थित होते.

पेमराज बोथरा म्हणाले की, दीन-दुबळयांच्या जीवनात आनंदऋषीजी हॉस्पिटल आनंद व प्रकाश निर्माण करण्याचे कार्य करीत आहे. नेत्रालय विभागाच्या माध्यमातून गावोगावी वाडी-वस्तीवर जावून दृष्टीदोष असलेल्यांना सेवा दिली जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. प्रकाश कांकरिया म्हणाले की, गरजू रुग्णांना दर्जेदार सेवा मिळण्यासाठी नेत्रालयात गुणवत्तेवर भर देऊन उपचार केले जात आहे. या दालनात ब्रॅण्डेड ऑप्टिकल्सचा लाभ देखील सर्वसामान्यांना मिळणार आहे.


डॉ. सुधा कांकरिया म्हणाल्या की, सर्वांच्या निरोगी दृष्टीसाठी आनंदऋषीजी हॉस्पिटलची तपस्या सुरू असून, याचा लाभ सर्वसामान्यांना दिला जात आहे. आनंद छाजेड यांनी आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या नेत्रालय विभागाचा आढावा घेताना आजवर ५ लाख नेत्रदोष असलेल्यांची तपासणी करुन त्यांना नवदृष्टी देण्याचे काम करण्यात आल्याचे सांगितले.

नवीन दालनात सर्व चष्मे व गॉगल्सवर ३० टक्के सुट देण्यात आली असल्याची माहिती त्यांनी दिली. या सवलतीचा लाभ घेण्याचे आवाहन हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आले आहे. उपस्थितांचे आभार कुंदन कांकरिया यांनी मानले.

# आचार्य महाश्रमण यांच्या अहिंसा यात्रेचे रविवारी नगरमध्ये आगमन

**समाचार/नगर-दि.११**

जैन श्वेतांबर तेरापंथ धर्म संप्रदायाचे ११वे आचार्य युगप्रधान श्री महाश्रमण यांच्या अहिंसा यात्रेचे आगमन रविवारी दि.१४ एप्रिल नगरमध्ये होत आहे. अ.ए.सो.च्या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलच्या वतीने दिवसभर अनेक कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. हे कार्यक्रम सर्व धर्मियांसाठी खुले ठेवण्यात आले आहेत, अशी माहिती संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांनी दिली.



आपल्या ऐतिहासिक महानगरात प्रथमच युगप्रधान आचार्य श्री महाश्रमण यांच्या अहिंसा यात्रेचे आगमन होत आहे. त्यांच्यासोबत ११० साधू-साध्वी असून नगरकरांना इतक्या मोठ्या संख्येने साधू-साध्वींच्या दर्शनाचा लाभ मिळणार असल्याने त्यांच्या दिव्य दर्शनासह अनमोल मार्गदर्शनासाठीची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. आचार्य श्री महाश्रमण हे आत्मकल्याणासह लोक कल्याण आणि परोपकार यावर विशेष भर देत असून अहिंसा यात्रेच्या माध्यमातून नैतिकता, प्रामाणिकता, अहिंसा, सदाचार आणि नशामुक्तिची प्रेरणा देऊन जनमाणसांत नवा उत्साह निर्माण करतात. नगर-पुणे रोडवरील माणिकनगर येथील जैन मंदिरामधून नवीन टिळक रोडने आचार्य श्री महाश्रमण यांच्यासह साधू-साध्वींचे आगमन रविवारी दि.१४ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता फिरोदिया हायस्कूलच्या प्रशस्त मैदानात होईल.

ध्वज घेतलेल्या मुलांचे पथक, लेझीम पथक आणि शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर स्वागतास उपस्थित राहणार आहेत. सकाळी ९.३० वाजता युगप्रधान आचार्य श्री महाश्रमण यांच्या अमृतवाणीतून दिव्य प्रवचनाचा सोहळा सुरू होईल. दुपारी १ ते २ दरम्यान शहरातील सर्व धर्मियांसाठी दर्शनाचा विशेष सोहळा आयोजित करण्यात आलेला असून इतर विविध विषयांवर मार्गदर्शन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यानंतर रात्री ८ ते ८.३० या वेळेत आचार्य श्री महाश्रमण यांच्या चरण स्पर्शचा विशेष सोहळा संपन्न होणार आहे.

शहरात प्रथमच येत असलेल्या युगप्रधान आचार्य महाश्रमण यांच्या स्वागतापासून दिवसभरातील सर्व कार्यक्रमांचा नगर शहरासह जिल्ह्यामधील भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, यासाठी सर्व कार्यक्रम सर्वांसाठी खुले ठेवण्यात आले आहेत, असेही छायाताई फिरोदिया यांनी सांगितले.

सोहम कप क्रेझी किक्रेट स्पर्धेचे उद्घाटन

# खेळांमुळे संघभावना व नेतृत्वगुण विकसित होण्यास मदत - सीए अशोक पितळे




**समाचार/नगर-दि.११**

खेळामुळे संघभावना, नेतृत्त्वगुण विकसित होण्यास मदत होते. जैन ओसवाल युवक संघाने राहुल पितळे यांच्या स्मरणार्थ क्रेझी क्रिकेट स्पर्धा आयोजित करून अतिशय स्तुत्य उपक्रम राबविला आहे. पितळे हे जॉईजच्या स्थापनेपासूनचे सक्रिय सभासद होते. या स्पर्धेत सर्व खेळाडूंनी खेळाचा निखळ आनंद घ्यावा. म्हणून एकत्र येत, आपुलकीचा संवाद घडण्यास मदत होईल, एकमेकांचा परिचय होईल, नवीन मैत्री, स्नेहबंध जुळतील असा विश्वास जैन ओसवाल पंचायत सभेचे उपाध्यक्ष तथा महाराष्ट्र खो खो असोसिएशनचे उपाध्यक्ष सीए. अशोक पितळे यांनी व्यक्त केला. अहमदनगर जैन ओसवाल पंचायत सभेच्या जैन ओसवाल युवक संघ (जॉइज)च्यावतीने नगरमध्ये सोहम कप क्रेझी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. अहमदनगर क्लब मैदानावर शानदार समारंभात स्पर्धेचे उद्घाटन झाले. यावेळी अशोक पितळे बोलत होते. कार्यक्रमास श्रीमती राखी पितळे, जैन ओसवाल पंचायत सभेचे सहसेक्रेटरी तथा सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेचे चेअरमन संतोष गांधी, प्रमोद गांधी, कमलेश भंडारी, सीए. गौरव पितळे, उद्योजक अभिजीत गांधी, गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेचे संचालक चेतन भंडारी, जॉइजचे अध्यक्ष प्रतिक बाबेल, सचिव सचिन मुनोत आदी उपस्थित होते.

स्वागत करताना प्रतिक बाबेल म्हणाले की, जैन ओसवाल पंचायत सभेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली सदर स्पर्धा दरवर्षी घेण्यात येते. क्रेझी क्रिकेट हा क्रिकेटचा वेगळा आणि निखळ आनंद देणारा प्रकार आहे. सर्वांनी अतिशय खिलाडूवृत्तीने स्पर्धेत सहभागी होवून चांगले प्रदर्शन करावे. १६ एप्रिल पर्यंत ही स्पर्धा होणार असून मुख्य संघांसह महिलांचे व मुलांचे संघ सहभागी झाले आहेत. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सचिन मुनोत यांनी केले. स्पर्धा यशस्वीतेसाठी जैन ओसवाल युवक संघ व जैन ओसवाल पंचायत सभेचे पदाधिकारी, सदस्य परिश्रम घेत आहेत.


- पाहिजेत -

सावेडीतील ब्रॅण्डेड रेडिमेड कपड्यांच्या दालनासाठी

सेल्समन/सेल्सगर्ल्स त्वरित पाहिजेत.

खालील मोबाईलवर संपर्क साधा किंवा बायोडाटा व्हॉटसॲप करा.

92095 92085

1 BHK फ्लॅट भाड्याने देणे

साताळकर हॉस्पिटलजवळ, तळमजल्यावरील 1 BHK फ्लॅट फॅमिलीकरिता भाड्याने देणे आहे.

संपर्क :- ॲड. प्रदीप गावडे

8275451524

सावेडी येथील नामांकित शोरुमसाठी

त्वरित पाहिजेत

एच. आर. - १
एम. बी. एम.
एच. आर. पदाचा कामाचा अनुभव आवश्यक

कॉम्प्युटर ऑपरेटर कम कॅशिअर - १
टॅली ज्ञान आवश्यक
(१ ते २ वर्षांचा अनुभव)

सेल्समन/सेल्सगर्ल - ५
(१ ते २ वर्षांचा अनुभव, पार्ट/फुल टाईम)

हेल्पर -२

(आकर्षक पगार) - अर्जासह समक्ष भेटा -

Franchise by DB VENTURES
One Stop Shop
SONY GIFTS PVT. LTD.
Address
Opp. Gold's Gym, TV Center, Savedi Road, A'Nagar




अखंडित गरम पाण्यासाठीचा सोपा मार्ग

१७ वर्षांपासून ग्राहकांच्या सेवेत

आदित्य एंटरप्राईजेस

गुलमोहर रोड, सावेडी, अहमदनगर
मोबाईल नं. : ९३२५१०३७८१




टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात

दिनांक - ६ एप्रिल ते १३ एप्रिल २०२४



| | |
|---|---|
| CREW | 9.00 AM, 10.00 AM<br>3.00 PM, 3.45 PM<br>8.00 PM, 10.45 PM |
| GODZILLA X KONG (HINDI) | 5.30 PM |
| GODZILLA X KONG (ENG) | 9.15 AM, 8.30 PM |
| स्वातंत्र्यवीर सावरकर | 9.15 AM, 12.30 PM<br>6.30 PM, 10.00 PM |
| अलिबाबा आणि चाळीशीतले चोर | 11.45 AM |
| लापता लेडिज | 2.15 PM |
| शैतान | 5.00 PM |
| मडगाव एक्सप्रेस | 7.45 PM |

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse

book my show CONNPLEX book my show

3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002

SASE DCORATERS



Mandap, Light & Flower Decoraters

Add. Katvan Khandoba Road, Ahmednagar

9822331006, 9579544110

